मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

मे

१९६२

★

ल्य ५० न. पैसे

या अंकात

* प्रा. गो. मा. कुलकर्णी
* प्रा. श्री. के. क्षीरसागर
* डॉ. अनंत फाटक
* प्रा. भा. श्री. परांजपे
* प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे
* माणिक भोयर
* मनोहर अपोनारायण
* वसु भगत
* म. ना. श्रीखंडे
* सुधीर देव

शिवाय, संपादकीय

संपादक:- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र—

:: संपादक मंडळ
भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे
मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादक:—श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] मे १९६२ [अंक १

अनुक्रमणिका

क्रमांक	विषय	पृष्ठ
१	संपादकीय	२
२	नव्या जगात	३
३	वास्तववाद–अेक मूल्य	१३
४	शोध	१८
५	एका खुळ्याची कहाणी	१९
६	अर्थ	१९
७	सौभाग्याचा ठेवा	२०
८	अबोल वीणा	२०
१०	नभोनाट्य आणि रंगनाट्य	२१
११	परिचय परामर्श	
	माझी जीवनकथा	२६
	चंद्र नभीचा ढळला	३२
	कळलाव्या कांद्याची कहाणी	३५

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

पुन्हा अेकदा शुद्धलेखन

मराठी साहित्य महामंडळाने आपल्या ऑक्टोबर १९६१ मध्ये झालेल्या बैठकीत शुद्धलेखनाची एक नियमावलि संमत केली. त्यानंतर वस्तुत: हा प्रश्न सुटायला हवा होता. परंतु त्या नियमावलीवर त्यानंतर बरीच चर्चा झाली. आणि नियमावलि अमलात येण्याचे लांबणीवर पडले. आता महामंडळाने आपल्या १७-४-१९६२ च्या सभेत या चर्चेतील मुद्यांचा विचार करून नियमावलीत कांहीहि फेरफार न करता पूर्वीचाच निर्णय कायम केला आहे व ही नियमावलि लवकरच छापली जाणार आहे. तेव्हां सर्व साहित्य संस्था, विद्यापीठे, ग्रंथकार, पत्रकार इ० संबंधितांनी या नियमावलीचा अवलंब करावा हे उचित होईल. महाराष्ट्र राज्यशासनानेहि त्या नियमावलीचा स्वीकार व पुरस्कार करावा. असे झाले तरच मराठी लेखनामध्ये चिरवांछित असा एकसूत्रीपणा येऊ शकेल. या बाबतीत मतभेदा पेक्षाहि एकसूत्रतेवर सर्वांनी भर द्यावा असे आम्हाला वाटते. कांही नियमांच्या बाबतीत विद्वानांचे मतभेद राहणे स्वाभाविकच आहे. परंतु ते मतभेद उगाळीत न बसता सर्वांनी महामंडळाची ही नियमावलि स्वीकारणे, अनुसरणे व पुरस्कारिणेच दूरदर्शीपणाचे ठरणार आहे.

अभिनंदन

सुप्रसिद्ध कादंबरीकार व टीकाकार प्रा. ना. सी. फडके यांना 'पद्मभूषण' ही पदवी देऊन भारत सरकारने त्यांचा जो उचित गौरव केला आहे त्याबद्दल आम्ही प्रा. फडके यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो व भारत सरकारला धन्यवाद देतो. कोणताहि संप्रदाय, पंथ, पक्ष, गट किंवा कंपू यापासून सर्वस्वी अलिप्त राहून प्रा. फडके यांनी गेली ५० वर्षे मराठी साहित्याची एकनिष्ठपणे अखंड सेवा केली आहे आणि मराठी साहित्याच्या विविध दालनात मोलाची भर घातली आहे. हे लक्षात घेता हा त्यांचा गौरव म्हणजे यथार्थ गुणगौरव ठरतो.

या पदवीप्राप्ति निमित्त मुंबई येथे झालेल्या त्यांच्या सत्कारप्रसंगी प्रा. फडके यांनी केलेले भाषण 'ही सात शल्ये मनी' या नांवाने किर्लोस्कर प्रेसने स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले आहे. त्याकडे आम्ही वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो. मराठी भाषेची व साहित्याची प्रतिष्ठा, प्रभाव व प्रसार ही जर

(पृष्ठ ३६ वर)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नव्या जगात

(लेखांक २ रा)

ले०—प्रा. गो. मा. कुलकर्णी
सेंटलुई, अमेरिका

जुने शब्द नवे अर्थ

डेरियन स्टेशनाला प्लॅटफॉर्म नाहीच म्हंटलं तरी चालेल. आम्ही खाली उतरलो व तिकिट चेकरनं आमचं सामान खाली काढलं. आम्हांला घ्यायला आमचे होस्ट व होस्टेसेस् आले होते. मुख्य होस्टेस् मिसेस् बारबारा अर्ले हिनं आपला व आपल्या बरोबरच्या बाकीच्यांचा परिचय करून दिला. आमचा परिचय के. एस्. कृष्णस्वामी यानं करून दिला. ज्याचा परिचय करून दिला त्याचा होस्ट व होस्टेस् पुढे येऊन त्याच्याशी हस्तांदोलन करून त्याला घेऊन जात असे. माझा परिचय करून देताच मिसेस् मेरी सीग्रेव्ह पुढे आली आणि हस्तांदोलन करून आपल्या तीन मुलींचा माझ्याशी तिनं परिचय करून दिला. त्या मुलींना पाहून मी सुटकेचा श्वास सोडला. याला थोडा गंमतीचा इतिहास आहे. मी नागपूरला असतांनाच मिसेस् सीग्रेव्हचं मला त्यांच्या कुटुंबात राहण्याचं निमंत्रण देणारं पत्र मिळालं होतं. त्या लहानशा पत्राच्या शेवटी तिनं लिहिलं होतं, Our three young daughters will be here when yon come, and I hope you are fond of girls.' आली का नाही पंचाईत ? 'यंग डॉटर्स' म्हणजे काय ? 'फॉंड ऑफ् गर्ल्स' म्हणजे काय भानगड आहे ? ह्यावरून नागपूरला ज्यांनी हे पत्र पाहिलं होतं त्यांनी थोडी माझी चेष्टाहि केली. प्रवासात जेव्हां आम्ही अमेरिकन कुटुंबातल्या वास्तव्या विषयी बोलत असू तेव्हां मात्र वाटायचं अमेरिकन 'रूड बॉय' परवडला, पण या तीन 'यंग डॉटर्स !' पण जेव्हां मिसेस् सीग्रेव्हनं आपल्या 'यंग' डॉटर्सचा माझ्याशी परिचय करून दिला तेव्हां मला हायसं वाटलं. त्या माझ्या मुली येवढ्या होत्या. सर्वांत मोठी मॉली ९ वर्षांची, दुसरी जेन ७।। वर्षांची आणि धाकटी मार्या ३।। वर्षांची. आता यांना 'यंग' कां म्हणावं हेच मला कळेना. पुढे लक्षात आलं की अमेरिकेत अनेक शब्दांचे अर्थ वेगळे आहेत आणि मुलं व मुली लवकर 'यंगहि' होतात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिष्टाचाराचं ओझं

पाहता पाहता आम्ही विभागले गेलो. एकमेकांचा निरोप घ्यायलाहि वेळ मिळाला नाही. मी मिसेस् सीग्रेव्ह व तिच्या तीन मुली यांच्यासह तिच्या मोटारीतून त्यांच्या घरी गेलो. संध्याकाळची वेळ होती. अंधार पडत होता. आणि सीग्रेव्हची मोठी शेव्हर्लेट गाडी अनेक वळणं घेऊन जात होती. रस्ते अरुंद पण डांबरी व स्वच्छ. दुतर्फा गवत आणि झाडी. सर्वत्र अगदी शांत. मी अतिशय थकलो होतो. सकाळी ७ वाजल्या पासून संध्याकाळी ५ वाजतां बसमधे बसे पर्यंत आम्ही सारखे उभे होतो. आणि कडकडीत उपोषण केलं होतं. बसची वाट पाहात असतांना एक कप कॉफी घेतली होती तेवढंच काय ते. पण अमेरिकेत थकायचं नसतं. नेहमी 'यूथफुल्' 'चिअरफुल्' असावं लागतं. म्हणून मोटार हाकणाऱ्या सौ. सीग्रेव्हशी कांही तरी बोलणं भागच होतं. बोलायचं म्हणजे हसणंहि भागच आहे. मात्र मोटारीत बसून शांत थंड वातावरणांतून जाताना थकवा बराच कमी झाला. मागच्या सीटवर बसलेल्या तिन्ही मुली माझ्याकडे कुतूहलानं पाहात होत्या हे मागे न पाहातांहि मला समजत होतं. त्यांच्या दृष्टीनं मी म्हणजे केवढं कुतूहल! आधीच पाहुण्या विषयी लहान मुलांना कुतूहल असतं त्यांत परदेशीय आणि श्यामलवर्णी पाहुणा मग काय विचारता. पण त्या मुली माझ्याशी फार प्रेमाने आणि अदबशीरपणानं वागल्या. सात वाजता सीग्रेव्ह कुटुंबाच्या घरी पोंचलो. दुसऱ्या मजल्यावरील एक खोली मला देण्यात आली होती. खोलीत पलंग, टेबल, खुर्ची, पुस्तकं, वर्तमानपत्रं, पोस्टाची पाकिटं वगैरे सामान व साहित्य व्यवस्थित मांडून ठेवण्यात आलं होतं, खोलीला जोडूनच बाथरूम होती आणि ती माझ्यासाठी स्वतंत्र होती. सर्व व्यवस्था पाहून मनावरचा ताण बराच कमी झाला.

डेरियन–शहर की खेडे ?

न्यूयॉर्कला उतरताच चारपाच दिवस अमेरिकन कुटुंबात आम्ही रहावं अशी व्यवस्था फोर्ड फाउन्डेशननं केली होती. त्यासाठी न्यूयॉर्क पासून सुमारे पन्नास मैलांवर असलेलं डेरियन हे लहानसं टुमदार गांव (टाउन) निवडण्यात आलं होतं. त्याला थोडं कारणहि आहे. गेल्या सहा वर्षांपासून डेरियन आणि म्हैसूर राज्यांतील कुर्ग जवळील मेटकारा यांचा सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाला आहे. डेरियन–मेटकारा कमिटी नांवाची एक समिति आहे. या समितीचे कांही सभासद मेटकाराला जाऊन आले आहेत. मेटकाराच्या लोकानी तीन वर्षांपूर्वी एक हत्ती डेरियनच्या लोकांना भेट म्हणून पाठविला होता तो सध्या वॉशिंग्टनच्या झू मधे आहे. डेरियनच्या लोकांना भारत व भारतीय यांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयी बरंच कुतूहल व कांहीशी आपुलकी आहे. न्यूयॉर्क पासून अंतरहि फार नसल्यामुळे डेरियन सर्व दृष्टीनं सोयीचं होतं.

डेरियन हे सुमारे वीस हजार लोकवस्तीचे ठिकाण आहे. हे केवळ वसतिस्थान आहे. इथे बाजारपेठ वगैरे काही नाही. डेरियनलाच लागून असलेल्या स्टॅन्फर्ड या लहानशा शहरी बाजारासाठी जावं लागतं आणि ते कांही कठीण नाही. कारण प्रत्येकाच्या घरी एकतरी मोटार आहेत. डेरियनचे बहुतेक पुरुष न्यूयॉर्कला कामासाठी जातात व संध्याकाळी परत येतात. मुंबईलाहि असंच करावं लागतं म्हणून सांगितल्यावर मिसेस् सीग्रेव्हला आश्चर्यहि वाटलं व बरंहि वाटलं. पन्नास मैलांवर असलेल्या न्यूयॉर्कच्या व डेरियनच्या जीवनात कितीतरी अंतर आहे. न्यूयॉर्कला जेवढी घाई–गडबड तितकी डेरियनला शांतता. धावपळ नाही, आवाज नाही, की कांही नाही. मात्र शहरी जीवनाच्या सर्व सोयी उपलब्ध. आपल्या कडील ग्रामीण जीवनहि असं झालं पाहिजे तर खेडयात चला म्हणण्याला कांही अर्थ आहे.

डेरियनमधे उत्तम सडका आहेत. शाळा आहेत, पोस्ट ऑफिसं आहेत. बागबगिचे व क्लब्स् आहेत, दवाखाना आहे, सुंदर ग्रंथालय आहे, न्यूयॉर्क व इतर शहरांना जोडणाऱ्या सुंदर सडका व रेल्वे आहेत, वीज व पाणीपुरवठा आहे, घरोघर टेलिव्हिजन सेट आहेत, आणखी काय पाहिजे ? जे न्यू यॉर्कच्या घरात असू शकतं ते सर्व डेरियनच्या घरात उपलब्ध आहे. मग कोण राहणार नाही डेरियन मधे ?

अमेरिकन घर

सीग्रेवांचं घर लहानसं पण टुमदार होतं. एक दिवाणखाना, एक जाळीचा वरांडा, चार झोपण्याच्या खोल्या, एक स्वयंपाक घर, एक मुलांची खोली. आणि तीन बाथरूम्स. घराभोंवती भरपूर मोकळी जागा पण बगीच्या नव्हता. घर दुमजली आणि पाया खेरीज बाकीचा भाग लाकडी. बाहेरची एक भिंत विटांची होती. घरावर कौलं होती. भिंतीना आतून कागद चिवटविलेला होता (रंगहि देतात पण कागद चिकटविण्याची पद्धत जास्त रूढ आहे.) बाहेरून निळी झाक असलेला पांढरा रंग देण्यात आला होता. दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यात जेवणाचा टेबल होता. त्याच्यावर सहाजणांची सोय होती. स्वयंपाकघरात गॅसचे स्टोव्ह, इलेक्ट्रिकचे हीटर्स व टोस्टर, भांडी धुण्याचं यंत्र कपडे धुण्याचं यंत्र, गरम व थंड पाण्याचे नळ, फ्रिजिडायर व खाद्यपदार्थाच्या वस्तूंची कपाटं इत्यादि व्यवस्थित मांडलेली होती. दहा फूट लांब व आठ फूट रुंदीच्या स्वयंपाकघरात ह्या सर्व वस्तू ठेवूनहि गर्दी वाटत नव्हती. आत फिरायला मोकळी जागा होती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सर्व कांही व्यवस्थित ठेवलेलं. पंधरा मिनिटात ब्रेकफास्ट आणि अर्ध्या तासात जेवण तयार होत असे.

आम्हांला ज्या प्रमाणे अमेरिकन कुटुंबात कसं वागावं या विषयींच्या सूचना देण्यात आल्या होत्या त्या प्रमाणेच आमच्या होस्ट्सनाहि आमच्याशी कसं वागावं याची माहिती देण्यात आली होती. आम्ही शाकाहारी आहोत, आमच्यात स्त्रीपुरुष संबंध कसे असतात, स्त्रियांनी जास्त सलगी केलेली आम्हांला आवडणार नाही, हिंदुस्थानातल्या स्त्रिया जास्त शालीन असतात, मुलं अदबशीर असतात वगैरे माहिती त्यांना पुरविण्यात आली होती. त्या बरोबरच आमच्या पैकी प्रत्येकाच्या कांही आवडीनिवडीहि आमच्या होस्ट्सना कळविण्यात आल्या होत्या. अमेरिकन लोक भात क्वचितच खातात. पण आम्ही भात खाणारे म्हणून पहिल्या दिवशी सौ. सीग्रेव्हन भात केला होता. आम्हांला तिखट लागते म्हणून मिठा बरोबर तिखटाची बाटलीहि टेबलावर ठेवली होती. आणि शक्यतो मला आमच्या पद्धतीचं जेवण मिळाव असा प्रयत्न केला होता. मी त्यांच्याकडे असे पर्यन्त सौ. सीग्रेव्हनं मांस शिजविलं नाही. त्या सर्वांनीहि शाकाहारी जेवणच घेतलं. मी तिला 'तुमचं नेहमीच जेवण तुम्ही घ्या मला कांही हरकत नाही. असं सांगितलं तरी तिनं मनावर घेतलं नाही. आणि मला असं दिसलं की अमेरिकन महिलेला सुद्धा कितीतरी शाकाहारी पदार्थ करता येतात. भात, फोडणीचा भात, इटालियन स्पेगॅत्ती आणि मार्कोरोनी, केक, पानकेक वगैरे कितीतरी पदार्थ मी खाल्ले. पानकेक हा सर्वात चांगला पदार्थ आहे आपल्या थालीपीठाच्या आकाराचा उकडलेल्या पुरी सारखा पदार्थ असतो. त्याच्यावर लोणी व सिरप माखून खायचा असतो. फार चांगला लागतो. त्यातून तो गरम गरम वाढण्यात येतो. जेवणात दुधाचा ग्लास असतो. रसाचा ग्लास असतो आणि शेवटी आइस्क्रीम असतं. त्यात कधी कधी द्राक्ष व इतर फळांचे तुकडे मिसळतात. त्यानंच पोट भरतं. निव्वळ शाकाहारी माणूस अमेरिकेत उपाशी राहात नाही. चांगलं पोटभर जेवतो. अर्थात् आपल्या पदार्थांची चव व गोडी यात नसते. पण पुढे संवय होते.

सीग्रेवांच्या तीन मुलींपैकी धाकटी मार्था आपल्या कडील मुलांसारखीच लाजाळू होती. माझ्याशी बोलावं अशी तिची फार इच्छा. पण संकोचहि फार. पहिल्या दिवशी ती हातानं तोंड झाकून बसायची, मधूनच हात काढायचा व पुन: तोंड झाकून घ्यायचं, हंसू आलं की पळून जायचं, असं करायची. दुसऱ्या दिवसापासून बरीच मोकळी झाली. तरी मधून मधून संकोच डोकावत असे मोठ्या दोन मुली बऱ्याच समंजस होत्या. थोडयाच बोलायच्या व आपल्या खोलीत जायच्या. आपला खेळ दाखवावा; अभ्यासाची पुस्तकं दाखवावी असं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्याकडील मुलाप्रमाणे त्यांनाहि वाटत होतं. मी त्यांची पुस्तकं, वह्या व खेळ पाहिला आणि मला ते सर्व आवडलं म्हणून सांगतांच मुलांना फार आनंद झाला.

मुली आपल्या आईस 'मॉऽऽऽम्' अशी हांक मारीत असत. आणि आई 'एस् हनी' किंवा 'एस् स्वीटी' अशा शब्दात प्रतिसाद देत असे. आई आणि मुली यांच्यामधील संबंध आणि प्रेम आपल्या पद्धतीचेच वाटले. (मी फक्त सीग्रेव्ह कुटुंबा संबंधी या ठिकाणी लिहीत आहे. आणखी बऱ्याच कुटुंबांतहि हेच दिसलं पण तेवढ्यावरून अमेरिकन कुटुंबाची कल्पना करता येणार नाही. त्या संबंधीचा हा लेख नाही) बहुतेक सर्व कुटुंबात मुलं आईला मॉम् आणि बापाला डॅड् किंवा डॅडी म्हणतात. आईबापांनी मुलांना व मुलांनी त्याना 'थ्यँक् यू' म्हणायची पद्धत आहे. साडेतीन वर्षाच्या मार्थाच्या पानकेकवर तिच्या आईनं सिरप ओतल्याबरोबर 'थँक् यू मॉम' असे सहजस्फूर्त उद्गार त्या पोरीच्या तोंडून निघाले. तसंच बशा, ग्लास, वगैरे मुलींनी धुण्याच्या ठिकाणी नेले की आई त्यांना 'थ्यँक्यू' म्हणायचीच. मग आमच्या सारख्या पाहुण्याला तर पदोपदी 'थ्यँक्यू' म्हणणं प्राप्तच होतं.

अमेरिकन शेजार

मी गेलो त्याच्या आधल्याच दिवशी मिस्टर सीग्रेव्ह वॉशिंग्टनला गेला होता आणि तिथेच कामानिमित्त अडकून पडला होता. मी तिथे पोंचल्या दिवशी रात्री दहा वाजतां त्यानं वॉशिंग्टनहून आपल्या पत्नीला फोन केला. त्यांच्या संभाषणात त्यानं माझी चौकशी केल्याचं व आपण तिथे राहूं शकत नाही याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केल्याचं मला स्पष्ट ऐकायला आलं. मिस्टर सीग्रेव्ह नसल्या-मुळे पाहुणचाराची, बोलण्या बसण्याची व स्थळं दाखविण्याची जबाबदारी येकट्या मिसेस् सीग्रेव्हवर येऊन पडली. पण त्या बाईनं आपली जबाबदारी फार चांगली पार पाडली. बोलण्यात ती चांगलीच हुषार होती. आपल्या शेजाऱ्यांना माझ्याशी बोलायला बोलावून आणि कांही जणांच्या घरी मला घेऊन जाऊन माझा वेळ कंटाळवाणा जाणार नाही याची तिनं काळजी घेतली. १२ ऑगस्ट रोजीं मी प्रथम 'बेबी-सिटर' हा प्राणि पाहिला. त्या दिवशी संध्याकाळी एका कुटुंबात आम्ही गप्पागोष्टी करायला जाणार होतो. घरी मुलींजवळ कुणीतरी राहायला पाहिजे होतं म्हणून मिसेस् सीग्रेव्हनं दोन मुलींना आणून घरी बसविलं. त्या हायस्कुलात जाणाऱ्या त्यांच्या शेजारच्या मुली होत्या. आम्ही सीग्रेव्ह कुटुंबाचे एक मित्र डॉ. ब्राउन यांच्या घरी गेलो. तिथे मित्रमंडळी जमली होती. पेयाचे ग्लास आणि बिस्किटांच्या बशा यांच्या साहाय्यानं गप्पा चालू होत्या.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांना कांही विषय नव्हता. आपण जसे आपल्या कौटुंबिक मित्रात स्वैर गप्पा करतो तशा त्या गप्पा होत्या. यजमानीण बाईंना माझं मोठ कौतुक वाटलं. येणाऱ्या मित्रांना ती म्हणायची, " Look, here is Mr. kukkarni (कुक्कार्नी) from India. He has come here only yesterday. He speaks English and is Laughing among us strangers. oh, I would'nt go a hundred miles away from my place." आणि मला पुन्हा पुन्हा विचारायची " How do you feel here ?" येवढ्या काळात अमेरिकन शब्दांची मला माहिती झाली होती. मी म्हणत असे, "Fine, excellent".

दुसरे दिवशी रात्री सीग्रेव्ह कुटुंबाचे आणखी एक मित्र मि. इस्लान यांच्याकडे मी जेवायला गेलो होतो. तिथे त्यांचं एक मित्र जोडपंहि जेवायला होतं. त्या दोन कुटुंबांत बरीच मैत्री होती असं दिसलं. त्यांच्या कौटुंबिक गप्पा मोठ्या मजेदार होत्या. इस्लानचा मित्र डेमॉक्रॅटिक पक्षाचा व त्याची बायको रिपब्लिकन पक्षाची होती. त्यांचे राजकारणावरून गमतीचे खटके उडत असत. इस्लानच्या मुलांचीहि सतंजण बरीच थट्टामस्करी करीत असत. ती मुलंहि मोठी शालीन दिसली. हिंदुस्थानात सारखा पाऊस पडतो का, वाघ, हत्ती, व साप आहेत का, काय काय पिकतं इथून तो तटस्थतेच्या धोरणा पर्यंत सर्व प्रकारचे प्रश्न त्यांनी मला विचारले. बहुतेक ठिकाणी असे प्रश्न विचारले जातात. त्यांना सर्व समजावून सांगितलं की, "oh, I did'nt know that" असं म्हणून एक-मेकाला, you see, we must know more about India" असं म्हणतात. आणखी दहा वर्षांनीहि असंच म्हणत राहतील.

एक सहल

दोन दिवसात डेरियन, नोरोटन, आणि स्टॅंफर्ड या शहरांचे सर्व भाग मी पाहिले. पोस्ट ऑफिसात जाऊन यंत्रानं पाकिटावर शिक्के कसे मारतात ते पाहिलं. वाचनालयात गेलो होतो तो वेळ फार चांगला गेला. त्या लहानशा गांवाच्या वाचनालयात तीस हजार पुस्तके होती आणि मुलांसाठी वेगळा भाग होता. पुस्तकांच्या शेल्फ मधून हिंडून चरित्राच्या भागात कुणाची चरित्रं आहेत ते पाहिलं. त्यात गांधी आणि नेहरू यांच्या चरित्रा वरील चार पुस्तकं पाहून थोडं बरं वाटलं. निदान ती तरी होती. १३ तारखेला डेरियन पासून ८० मैलांवर हडसन नदीच्या काठी माउंट बीकन नांवाच्या पर्वतावर रेल्वेनं जाऊन आलो. १५४० फूट उंचीच्या शिखरावर रेल्वे-ट्रालीनं जाता येतं. रेल्वेची लांबी २३८४ फूट आहे. या वरून किती सरळ चढाव आहे याची कल्पना येईल. खालून पाहिलं तर भीतीच वाटते. एक ट्रॉली वर जाते व दुसरी खाली येते. ट्रॉलीत बसून वर जातांना कुणीतरी अधांतरी वर ओढून घेत आहे असं वाटतं. वर जावं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसतशी दृष्टी व्यापक होत जाते. शिखरावरून हडसन नदी आणि सभोवतालची सृष्टिशोभा फार चांगली दिसते. शिखरावरहि आइस्क्रीम आणि कोकाकोला आहेच. आम्ही माउंट बीकनवर रेल्वे ट्रॉलीनं जाऊन आलो असं सौ. सीग्रेव्हनं आपल्या शेजाऱ्यांना सांगितलं तर 'Is there any such thing near here ?' असं त्यांनी विचारलं. बऱ्याच जणांनी मॉउंट बीकन पाहिला नव्हता व कांहींना तर तो माहीतहि नव्हता. मला बरं वाटलं. नागपूर जवळची पुष्कळशी ठिकाणं मी पाहिली नाहीत. तसंच डेरियनच्या लोकांनी माउंट बीकन पाहिला नाही. आपण कांही एकटे नाही या कल्पनेने समाधान वाटलं.

तिथून परत येताना डेरियनचा झू पाहिला. वास्तविक कांही पाहण्या सारखं नाही. एक मात्र गंमत कळली. तिथं एका ठिकाणी गाय (आपली साधी गाय), दोन वासरं आणि बाजूलाच शेळया व त्यांची पिल्लं दिसली. मला वाटलं सहज बांधली असतील. तरी जरा चमत्कारिकच वाटलं. मिसेस् सीग्रेव्हनं मुलींना 'ही गाय, ही बकरी' म्हणून दाखविलं तरी माझ्या लक्षात आलं नाही. पण मनात विचार चालू असावा. इतर पशुपक्षी पाहतांना एकदम जाणवलं की अमेरिकेंत मुलांना साधी गाय झू मधेच पाहायला मिळणार. कारण जनावरं कुठे असतात कुणास ठाऊक ? मला तरी चार महिन्यात एकहि 'ढोर' दिसलं नाही.

१४ ऑगस्ट रोजी सकाळी आम्ही सर्वजण मिसेस् बारबारा अर्लच्या घरी जमलो–दोन दिवसांच्या ताटातुटी नंतर आम्ही पुन्हा एकत्र आलो. पण आपापले अनुभव मोकळेपणानं बोलायला संधि नव्हती. तिथून आम्ही तीन मोटारीतून न्यूयॉर्कला गेलो. अमेरिकेतल्या 'हाय् वे' वरून प्रथमच प्रवास करीत होतो. अतिशय गुळगुळीत व रूंद रस्ते संबंध अमेरिकाभर बांधलेले आहेत. या रस्त्यांवरून ताशी ७० मैल वेगानं मोटारी धावतात. ५५ मैलांहून कमी वेगानं मोटार हाकताच येत नाही. वेग थोडा कमी झाला की मागून येणारी मोटार आदळलीच पुढच्या मोटारीवर. येवढे असूनहि एरव्ही अपघात फार होत नाहीत हे आश्चर्य आहे. हाय् वे वरून जाताना ठराविक मैल अंतरावर टोल नाके असतात. तिथे पंचवीस सेंट कर भरून पुढे जावं लागतं. आम्ही मिसेस् अर्लच्या गाडीत बसलो होतो. 'एवढ्या चांगल्या रस्त्यावरून जाण्यासाठी इतका कर देणं आवश्यकच आहे' असं ती म्हणाली. दुमजली रस्ते सुद्धा बांधण्यात आले आहेत. सडकांच्या अशा सोयीमुळे अमेरिकेत रेल्वेला फार हादरा बसला आहे. आपल्या रेल्वेचा दिमाख अमेरिकेच्या रेल्वेत नाही. बहुतेक लोक आपल्या मोटारीतून प्रवास करतात. अंतर फार लांब असल्यास विमानानं जातात. मालवाहतूक ट्रक्सनं होते. त्यामुळे रेल्वे घाटयात आली आहे. सरकारनं मदत न केल्यास

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुष्कळ रेल्वे कंपन्यांना आपला गाशा गुंडाळावा लागेल असा इषारा सध्या कंपन्या देत आहेत.

राष्ट्रसंघाची इमारत

दहा वाजता आमच्या मोटारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या इमारतीत शिरल्या. मोटारी थेट तळघरात नेऊन ठेवायच्या असतात. तिथून एका लिफ्टमधून (अमेरिकेत एलिव्हेटर म्हणतात) तिसऱ्या मजल्यावर गेलो. लिफ्टमधे आम्ही शिरलो, दार बंद झालं व लगेच उघडलं. आम्हांला वाटलं कुणीतरी आणखी येणार असेल. पण आमचे 'होस्ट' लिफ्टच्या बाहेर पडायला लागले तेव्हां आम्हांला कळलं की इच्छित स्थळी आपण पोचलो आहोत. संयुक्त राष्ट्रसंघाची इमारत पाहण्यासाठी तिकिटं काढावी लागतात. पंचवीसच्या एका गटाला एक गाइड देऊन पाठवण्यात येतं. आम्ही पंधरा जण होतो पण आमची 'स्पेशल केस' ठरवून आम्हांला एक गाइड देण्यात आला. हा गाइड म्हणजे एक सुंदर मुलगी होती. ती तोंडानं तर बोलत होतीच पण त्यापेक्षा डोळ्यांनी जास्त बोलायची. जास्त बोलत असे का जास्त हसत असे हे ठरवणं कठीण होतं. ती दक्षिण भागातली होती व तिचे उच्चार कळणं आम्हांलाच काय पण आमच्या होस्ट महिलांनाहि कठीण होतं. अमेरिकेत ही उच्चारांची भानगड फार आहे. चार दिशांचे उच्चार चार प्रकारचे. मात्र हळूहळू आम्हांला त्या गाइड मुलीचे उच्चार कळायला लागले. अतिशय नाटयमय रीतीनं तिनं आम्हांला सुरक्षा समिति, विश्वस्त समिति, सामाजिक व आर्थिक समिति, आणि साधारण सभा यांची दालनं दाखविली. प्रत्येक दालनात आम्हांला बसवून त्या समितीचं कार्य काय हे ती समजावून सांगायची. विद्यार्थ्यांना ज्या गोष्टी मी शिकवीत असे त्या तिच्याकडून पुनः मी शिकलो. त्यावेळी संयुक्त राष्ट्र संघाच्या कोणत्याहि समितीची बैठक नव्हती. मला त्याची रुखरुख वाटल्या शिवाय राहिली नाही. उंच खोक्यासारखी दिसणारी इमारत सचिवालयाची आहे. ती ३९ मजली आहे. ती आम्ही आतून पाहिली नाही. ती प्रेक्षकांना खुली नाही. त्या दिवशी दुपारचं जेवण आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाच्या कँटीनमधे केलं. तो प्रदेश आंतरराष्ट्रीय असल्यामुळे सर्व देशाचं जेवण तिथे मिळतं. आम्हांला दहीभात खायला मिळाला. आपण आपल्या प्रदेशातच आहोत असं उगीचंच मला वाटलं. पहिल्या मजल्यावर दुकानं आहेत. तिथे सर्व देशांच्या वस्तू मिळतात. भारतीय बाहुल्या, मुरादाबादी तबकं, मण्यांच्या माळा वगैरे तिथे होत्या.

१०२ मजल्यांची इमारत

तिथून बाहेर पडल्यावर आम्ही पायीच जगातील सर्वात उंच इमारत 'एम्पायर स्टेट बिल्डिंग' ही पाहायला गेलो. सुमारे मैलभर चालावं लागलं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऊन अतिशय कडक होतं. उन्हाळ्यात मुंबईच्या सडकेवरून चालल्या सारखं वाटलं. वाहतूक नियंत्रण स्वयंचलित व चांगली आहे. सर्वजण नियम कटाक्षानं पाळतात म्हणून अपघात कमी होतात. एम्पायर स्टेट बिल्डिंग ही १०२ मजली इमारत आहे. बाहेरून उंचच्या उंच एक मनोरा असल्या सारखी वाटते. आंतून चांगलीच प्रशस्त आहे. प्रत्येक मजल्यावर निरनिराळी ऑफिसं आहेत. इमारतीवर जाण्यासाठी एक डॉलरचं तिकीट घ्यावं लागतं. तिकिटासाठी लांबच्या लांब रांग होती. रोज सुमारे पांचसहा हजार लोक ती इमारत पाहतात. तिकिटं घेऊन आम्ही लिफ्टमधे शिरलो. लिफ्ट सुरू झाला व आमचे कान बहिरे झाले. अर्ध्या मिनिटात आम्ही ऐंशीव्या मजल्यावर गेलो. तिथे लिफ्ट बदलावा लागतो. दुसऱ्या लिफ्ट मधून शंभराव्या मजल्यावर गेलो. तिथून सर्व न्यूयॉर्क शहराचा देखावा दिसतो. वर दुर्बिणी बसविल्या आहेत. यंत्रात दहा सेंटचं नाणं टाकलं की दुर्बिण खुली होते आणि तीन मिनिटं तिच्यातून पाहतां येतं. दुर्बिणीतून सभोवतालचा देखावा मोठा मजेदार दिसतो. हडसन नदीचे दोन फाटे शहराच्या दोन भागातून जातात. आम्ही बंदरात ज्या ठिकाणी उतरलो ती जागा सुद्धा पाहायला मिळाली. इमारतीच्या शेवटच्या दोन मजल्यावर घुमट आहे. तिथे जिना चढून जावं लागतं. त्यासाठीहि बरीच मोठी रांग होती म्हणून आम्ही वर जाण्याचा नाद सोडून दिला. शंभराव्या मजल्यावरूनच खाली पाहिलं तर बाकीच्या तीसतीस चाळीसचाळीस मजली इमारती ठेंगण्या वाटत होत्या. सडकेवरची माणसं व मोटारी तर सोंगट्या येवढी दिसायची. कांहींना तर खाली पाहवत नसे. इमारतीची उंची १४७२ फूट असून न्यूयॉर्क शहराच्या मध्यवस्तीत ती आहे. आता पर्यंत इमारतीनं तीन मालक बदलले. आम्ही गेलो होतो त्या सुमारास इमारतीच्या हस्तांतराची बोलणी चालू होती असं कळलं. या वरून इमारतीच्या नांवामधे जरी एम्पायर व स्टेट हे शब्द असले तरी सरकारचा इमारतीशी कांही संबंध नाही हे कळेल.

एम्पायर स्टेट बिल्डिंगमधून बाहेर पडल्यानंतर बस मधून शहराच्या कांही भागात चक्कर टाकली. सडकेच्या दुतर्फा उंचच उंच इमारती असल्यामुळे रुंद सडक सुद्धा अरुंद वाटायची व आपण एखाद्या दरीतून जात आहोत असा भास व्हायचा. शेवटी गुगेनहाइम म्यूझियम व मेट्रापॉलिटन म्यूझियम हे दोन म्यूझियम पाहून ७ वा. डेरियनला परत गेलो. दोन्ही म्यूझियम इतर कोणत्याहि मोठ्या म्यूझियम प्रमाणेच होती. अनेक दालनं व व्यवस्थित मांडणी. सर्व म्यूझियम पाहणे शक्यच नव्हते म्हणून प्रत्येकानं आपल्या आवडी प्रमाणे कोणताहि भाग पाहावा असं ठरवण्यात आलं. मी मुख्यत: जुन्या मूर्तींचा भाग पाहिला. ब्रिटिश म्यूझियम पाहिलं असल्यामुळे विशेष कांही वाटलं नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुग्रेनहाइम म्यूझियमची इमारत मात्र वर्तुळाकार असून सभोवतालच्या इमारती वेगळेपणानं उठून दिसते.

आधी लंडन मग न्यूयॉर्क

इथे एक विचार सांगावासा वाटतो. भारतात असताना नेहमी मला वाटायचं की अमेरिकेला जाणारांनी सरळ न्यूयॉर्कला न जातां लंडनला जाऊन कां जाव? एक प्रकारचा कमीपणा वाटायचा. पण आम्हीहि आलो लंडन मार्गेच कांही अनुभवावरून आता असं वाटायला लागलं आहे की लंडन मार्गे अमेरिकेला येणं चांगलं. अमेरिकन लोकांना आपल्या यांत्रिक प्रगतीचा चांगलाच अभिमान आहे. रास्तहि आहे. पण त्यांना वाटतं की भारतीय किंवा इतर आशियाई लोक फार मागासलेले आहेत. लंडनहून आलं की पुष्कळ गोष्टींचा अनुभव तिथं मिळतो व अमेरिकेत कांही बुजल्यासारखं वाटत नाही. उलट एखाद्यानं लंडन पाहिलं आहे यांचा अमेरिकनावर कांहीसा दाब पडतो. अजून अमेरिकनांवर देखील ब्रिटिशांचं थोडं तरी वर्चस्व आहे. लंडनला आम्ही फिरत्या जिन्यावरून पुष्कळ वेळां गेलो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या इमारतीत एक असा जिना लागला. मिसेस् अर्ले झटकन् पुढे होऊन म्हणाली, "मी तुम्हांला दाखवते कसं या जिन्यावरून जायचं." तों व कृष्णस्वामी पुढे झाला व "We are accus tomed to it" म्हणून सरळ फिरत्या जिन्यावरच्या पायरीवर जाऊन उभा राहिला. हा थोडा अशिष्टपणा झाला, पण नंतर प्रत्येक ठिकाणी तुम्ही हे लंडनला पाहिलंच असेल असं आमच्या होस्टेस् म्हणायला लागल्या. आम्ही अगदीच 'गांवढळ' नाही हे त्यांना समजलं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वास्तववाद—अेक मूल्य

लें०—प्रा. श्री. के. क्षीरसागर
अनु—श्री. मा. कुलकर्णी

(मुंबई येथे नोव्हेंबर १९६१ मध्ये भरलेल्या 'अखिल भारतीय लेखक संमेलनात' प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी वाचलेल्या मूळ इंग्रजी निबंधाचा हा मराठी अनुवाद आम्ही येथे प्रसिद्ध करीत आहोत. 'युगवाणी' साठी प्रा. क्षीरसागरांनी हा निबंध दिला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.)

—संपादक

"कलेत वास्तववाद म्हणजे पद्धति नव्हे तर प्रवृत्ति आहे" असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की वास्तववाद विविध प्रकारे आविष्कृत होऊ शकतो. "क्वचितच एखादा सौंदर्य हेतु असा असेल की त्याचा तर्कशुद्ध विकास केला असता कमी अधिक प्रभावी असा वास्तववादाचा प्रकार त्यातून निष्पन्न होणार नाही."

'वास्तववाद' हा शब्द जरी तत्वज्ञानाच्या क्षेत्रातून घेतला असला तरी त्याचा साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रातील अर्थाचा मुळाशी कसलाहि संबंध नाही. आधुनिक तत्वज्ञानात ही संज्ञा ज्या अर्थांनी वापरली जाते त्यापैकी एका अर्थानुसार हा शब्द कल्पनावादाला विरोधी ठरतो. त्यानुसार आपल्या जाणीवेतील दर्शनाहून भिन्न अशी एक वास्तवता आहे. तत्वज्ञानातील एका वास्तववादाचे म्हणणे असे की वस्तूंना जाणीवेपेक्षा स्वतंत्र असे अवकाशातील अस्तित्व आहे.

साहित्यात व कलेत वास्तववाद हा एकीकडे आदर्शवाद व दुसरीकडे स्वच्छंदवाद यांच्याहून वेगळा मानला जातो. वस्तूंना, मला त्यांच्या असलेल्या जाणीवेहून वेगळे व स्वतंत्र असे अस्तित्व जर खरोखरीच असेल तर कलावंत या दृष्टीने माझी जबाबदारी निश्चितच प्रमाणतः अधिक वाढते. वास्तवता की सौंदर्य असा प्रश्न उत्पन्न झाला असता जो आपल्या कलेतून वास्तवतेचीच बूज राखतो तो खरा वास्तववादी असेहि गृहीत धरले जाते. याचा अर्थ हा की

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वास्तववादी हा आपले विषय केवळ सुंदर व सुसंवादी यांच्यातूनच निवडण्याचे नाकारतो. इतकेच नव्हे तर एक पाऊल पुढे जाऊन तो कुरूप व अनास्वाद्य वस्तूच अधिक पसंत करील. आधुनिक वास्तववादाच्या या बाजू मुळे वास्तववाद म्हणजे एक पद्धति किंवा सिद्धान्त नसून एक आघात किंवा कदाचित् एक प्रतिक्रिया असावी असा समज होणे शक्य आहे.

वास्तववाद हा सिद्धान्त असो, पद्धति असो, प्रवृत्ति असो की आघात असो प्रस्तुत आपला उद्देश या आघाताकडून कलावंताचे कलेचे उद्दिष्ट साध्य होते की नाही हे पाहणे हा आहे. इथे पुन्हा आपण कलेचे उद्दिष्ट व स्वरूप या पुरातन प्रश्नावर येऊन ठेपतो. 'निसर्गासमोर आरसा धरणे हे जर कलेचे साध्य असेल तर मग तिने यावत्शक्य 'यथातथ्य' असे निसर्गाचे प्रतिबिंब दाखवावे. आणि या उलट जर कला म्हणजे कलावंताचा आत्माविष्कार असेल तरीहि कलावंताने आपल्या 'स्व'शी अगदी कठोरपणे प्रामाणिक राहिले पाहिजे.' यापैकी कोणत्याहि प्रकारातील प्रामाणिकपणा व यथातथ्य हेच वास्तववादाचे सार आहे असे मला वाटते.

आधुनिक वास्तववादात आणखी अेक गोष्ट गर्भित आहे. 'यथातथ्य दर्शन हे त्याचे उद्दिष्ट असल्यामुळे तो धार्मिक अगर सामाजिक कसलेच निषेध मानीत नाही. तात्पर्य तो प्रामाणिक, धीट, यथातथ्य व कठोर आहे. हे सर्व मान्य करूनहि एक प्रश्न शिल्लक राहतो. प्रामाणिकपणा व कठोरता हीच कलेला पुरेशी आहेत काय ? तेन सारख्या टीकाकारांनी असेच गृहीत धरले आहे असे वाटते. लेखकाने सर्वप्रथम वस्तुनिष्ठ असले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा आहे. त्याने केवळ वृत्तांतकथन करावे—नव्हे एखाद्या प्रकरणाची केवळ 'चौकशी' करावी. आणि अशा रीतीने एखाद्या कादंबरीकाराने प्रमाणभूत निर्णय देण्याचे, तात्त्विक अर्थ उलगडण्याचे, आणि वागणुकीसाठी उपदेश करण्याचे टाळले पाहिजे. कोणी विचारील, या प्रकारे काय साध्य झाले ? या प्रकारच्या कलेचे सर्वोच्च साध्य म्हणून सांगितले जाते ते तिच्यामुळे वाचकाला कथित अशा त्या प्रसंगात वा देखाव्यात भाग घेतल्या सारखे वाटते—कला वाचकाला 'जीवनाचा तुकडाच' जणू देते असे ते म्हणतात.

या प्रमाणे पाहता, वास्तववादी कला जीवनाच्या अन्वयार्थाला लक्ष्य करीत नाही तर जीवनात प्रतिनिधि रूपाने भाग घेण्याला लावणे हे तिचे उद्दिष्ट असते. आमचे जीवनातील अनुभवक्षेत्र मर्यादित असल्यामुळे कला जणू काय आम्हाला अनुभवांचा विस्तार करण्याची संधि देते. कलेचे हे ध्येय फार लोकांना मान्य होणार नाही असे मला वाटते. आणि ज्यांना हे मान्य आहे त्यांनाहि वाङमयाच्या द्वारा जीवनाचे शुद्ध वस्तुनिष्ठ 'कथन' शक्य आहे, असे म्हणणे कठीणच जाईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वास्तववादाची अपेक्षा अशी की लेखकांनी आपले 'वृत्तकथन' स्वतःच्या भाव-भावना व निष्कर्ष यांच्यामुळे शबलित होऊ देऊ नये. पण घटनेच्या निवडी पासूनच किंवा तपशीलाच्या निवडीतच हे 'शबलीकरण' सुरू होते. कला म्हटली की निवड आलीच. आणि अगदी आत्यंतिक वृत्तकथनपर वास्तववादहि याला अपवाद नाही. असे जर आहे तर मग वास्तववादी कलेतहि घटना व तपशील यांची व्यक्तिनिष्ठ निवड आलीच. परिणामतः तिच्यांत नैतिक निर्णय किंवा भावनिक पसंती अभिप्रेत राहणारच. वास्तववादी कलेतहि अपरिहार्य असणारा व्यक्तिनिष्ठतेचा व निवडीचा अंश हा माझ्या मते शुद्ध वास्तववादाच्या दाव्याशी सुसंगत नाही. कलेत काय किंवा जीवनात काय वस्तूंना व घटनांना महत्त्व असते ते त्यांच्या परस्पर संबंधामुळे व त्याबरोबरच मनुष्याने त्यांना चिकटविलेल्या अर्थामुळे. या दोन्ही गोष्टी जर आपल्या तथाकथित वृत्तकथनातून कळवायच्या असतील तर वैयक्तिक पसंती व अन्वयार्थ लावणे यांचा प्रवेश अनिवार्य आहे. वृत्त कथनातील यथार्थता सौंदर्य–दृष्टीनेहि महत्वाची आहे हे मान्य केले पाहिजे. त्यामुळे कथनाला विश्वसनीयता येते आणि वास्तववाद्यांना प्रिय असलेले जे 'भाग घेणे त्याला सहाय होते; तसेच स्वच्छंदवाद्यांना प्रिय असलेला आभास निर्माण होण्यालाहि मदत होते. पण प्रश्न हा आहे की, वैयक्तिक पसंती पासून अलिप्त अशी यर्थार्थता असते काय ?

खरी गोष्ट ही आहे की वास्तववाद हे स्वतःसिद्ध असे एक मूल्य नव्हे. प्रत्यक्ष जीवनात देखील वास्तववाद–आभासापासून सुटका असे त्याचे स्वरूप असल्यामुळे–ही एक अभावात्मक वस्तु आहे. जीवनात त्याला जे भावात्मक मूल्याचे रूप प्राप्त होते ते त्यात आम्ही जो अर्थ पाहतो त्यामुळे होते. जीवनात काय किंवा कलेत काय अर्थ किंवा महत्त्व हा नेहमीच व्यक्तिनिष्ठ घटकच असतो. पण जीवनात अथवा कलेत हा व्यक्तिनिष्ठ अंश असल्यामुळे, तथाकथित वास्तव-वाद्यांना वाटते त्या प्रमाणे वास्तववादाची महती कमी होत नाही. नैतिक आणि सौंदर्यात्मक मूल्यापासून प्रारंभ करणारेहि वास्तववादाची वूज राखतात. त्यांना जीवनात गवसणारा अर्थ वाचकांच्या पर्यंत पोचू शकतो तो जीवनाच्या यथार्थ चित्रणामुळेच होय. एक विरोधात्मक प्रसंग आपल्या समोर उभा आहे ! ज्यांना कलेच्या द्वारा स्वतःच्या आवडी निवडी संक्रांत करावयाच्या आहेत आणि ज्यांना काही प्रमाणभूत निर्णय द्यायचे आहेत वा आपल्या मनातील काही प्रमुख उपदेशांना वाचा फोडायची आहे ते यथातथ्य वास्तववादाची कास धरण्यात अग्रेसर आहेत.

माझा हा मुद्दा प्राचीन अभिजात काव्याची पद्धति आणि टॉलस्टॉय, टागोर किंवा शरच्चंद्र या आधुनिकांची पद्धति या दोन्हीहि सारख्याच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समर्पकतेने विशद करतील. महाभारतकारांनी आपला नैतिक व सामाजिक हेतु लपविलेला नाही. 'धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते' हा या महान भारतीय महाकाव्याचा संदेश आहे आणि महर्षि व्यासांनी तो अगदी उघडपणे मांडला आहे. तरी पण प्रसंगाच्या निवेदनात किंवा व्यक्तीच्या चित्रणात व्यास हे सामान्यत: अत्याधुनिक अर्थाने वास्तववादी आहेत. सामान्यत: असे मी म्हणतो याचे कारण ज्या काळात हे महाकाव्य रचले गेले त्या काळाचा ठसा त्याच्या 'तंत्रावर' उमटला आहे. सूक्ष्मतम व धाडसी अशा वास्तववादाच्या छटा असूनहि महाभारताला त्या इतिहास-पूर्वकाळी प्रिय असलेला दैवी अंश टाळता आलेला नाही. पण मला महाभारताचे उदाहरण येथे शुद्ध वास्तववादाचे उदाहरण म्हणून द्यावयाचे नाही तर प्रतिज्ञित नैतिक हेतु देखील धाडशी व अत्यंत वस्तुनिष्ठ अशा वास्तववादाच्या आड येऊ शकला नाही हे दाखविण्यासाठी त्याचा उल्लेख मी केला आहे. टॉलस्टॉयला प्रिय असा नैतिक हेतु सुप्रसिद्धच आहे. त्याची कलाविषयक मते देखील त्याच्या कादंबऱ्या मागील अशा हेतूंचे सैद्धांतिक समर्थनच करतात. पण असे असले तरी त्याच्या ॲनाकॅरेनिना किंवा krentzar sonnata यातील वास्तववादाची शुद्धता आपण नाकारू शकतो काय ? या दुसऱ्या कृतीतील नैतिक संदेश तर इतका स्पष्ट आहे की एक गुन्हेगारीवरील कथा म्हणून तिच्याकडे वळणाऱ्या सामान्य वाचकाच्या देखील तो लक्षात आल्याशिवाय राहत नाही. यात टॉलस्टॉयने अगदी वायवलच्या सुरात सुडाविरुद्ध उपदेश केला आहे. पण ही गुन्हेगारीची कथा अत्याधुनिक मानसशास्त्रीय वास्तववादी पद्धतीने सांगितली आहे. मी थोडा पुढे जाऊन असं म्हणतो की टॉलस्टॉयच्या ठिकाणी निश्चित नैतिक मतं आणि भावनिक पसंती नसती तर त्याला हे वास्तववादी तंत्र इतक्या परिपूर्णतेने अवलंबिता आले नसते.

यावरून आपण दोन परस्पर विरोधी निष्कर्ष काढू शकतो. नैतिक व भावनिक पसंती असणारा लेखक आपल्या साहित्य कलेत शुद्ध वास्तववाद पूर्ण कौशल्याने वापरू शकतो; आणि उलट, ज्याला नैतिक किंवा भावनिक कल असण्याची विलक्षण धास्ती आहे असा लेखक वास्तववाद व वस्तुनिष्ठता असतांनाहि कांही नैतिक पसंती दर्शविणे शक्य आहे. अर्थात यात, माझ्या दृष्टीने तरी, कलेचे अपयश नाही; मग स्वत: कलावंत निराळा विचार खुशाल करो ! माझा मुख्य मुद्दा हा आहे की केवळ वास्तववादाकडे 'एक वाङ्मयीन मूल्य' म्हणून पाहता येणार नाही. इतकेच नव्हे तर जोपर्यंत भावनिक किंवा नैतिक अशी पसंती प्रोत्साहक म्हणून त्याच्या मागे नाही तो पर्यंत वास्तववादाला कांहीहि कलात्मक महत्त्व असू शकत नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येथे वाचकांना एका संभाव्य गैरसमजाबद्दल इशारा दिला पाहिजे. मी लेखकांच्या नैतिक मतांना मते म्हणून महत्त्व देत नाही. माझ्या दृष्टीने त्याचे जे महत्त्व आहे ते कलेला आवश्यक असे अेक निवडीचे तत्व म्हणून. कला म्हणजे एक प्रकारचे चित्रण आहे—आत्माविष्कारहि याला अपवाद नाही; आणि जो पर्यंत एखादे निवडीचे तत्व त्याच्या मागे कार्यकर असत नाही तो पर्यंत ते चित्रण अर्थपूर्ण होऊं शकत नाही. असे निवडीचे तत्व अंशत: नैतिक व अशत: सौंदर्यनिष्ठ असू शकेल. परंतु एखाद्या तटस्थ व अनिश्चयी अशा निवडीच्या तत्वाची मी कल्पना करू शकत नाही. असे 'मध्यस्थ' जे असेल ते निर्माणक्षम कसे राहू शकेल? अर्थात् तटस्थतेला—मध्यस्थपणालाहि कलेत निर्माणक असे एक कार्य आहे. कलात्मक संयम साधण्याला त्याचा अप्रत्यक्ष उपयोग आहे. पण संयम हीहि—कलेच्या यशाला आवश्यक असली तरी—एक अकरणात्मक शक्ति आहे. पण नुसत्या संयमाने कांही साध्य होऊ शकते काय? निरोध करण्यासाठी व पाट काढून देण्यासाठी कशाची तरी विपुलता असेल तरच संयमाला योग्य असे स्थान राहील.

आतापर्यंत कोणाहि टीकाकाराने वास्तववाद व 'वस्तुनिष्ठता' यातील भेददर्शक सीमारेषा दाखविल्याचे मला माहीत नाही. त्या दिशेने प्रयत्न करण्याचे धाडस मला करूं द्याल तर मी असे सुचवीन: "वस्तुनिष्ठतेला सहानुभूतीचे वावडे नाही; उलट आधुनिक वास्तववाद सहानुभूतिसह सर्व नाजूक भावनांचा तिरस्कार करतो असे वाटते." येथे वस्तुनिष्ठतेचे रूपांतर अलिप्तपणात होते व अलिप्तपणा थंडपणा मध्ये अपभ्रंश पावतो; हा थंडपणा तुसडेपणापेक्षाहि (cynicism) कमी मानवी आहे. प्राचीन अभिजात काव्यातील वस्तुनिष्ठतेचे लक्षण असणारी प्रतिष्ठा ही केवळ वास्तववादामुळे आलेली नाही किंवा नुसत्या वस्तुनिष्ठतेमुळेहि नाही तर उदार दृष्टि व व्यापक सहानुभूति यांच्यातून निर्माण झालेल्या वस्तुनिष्ठतेमुळे होय. व्यक्तिनिष्ठतेपेक्षाहि अधिक 'उबदार' अशी ती वस्तुनिष्ठता होती. लेखकाच्या निश्चित जीवनविषयक दृष्टिकोणामुळे तसेच एखाद्या ऋषि प्रमाणे जीवनाचा—त्यातील सर्व सुखदु:खानिशी, सफलते—विफलतेनिशी भव्यते—भीषणते सह—स्वीकार करण्यामुळे ही 'ऊब' तिला प्राप्त झाली होती. जीवनावरील या प्रेमामुळेच त्याची वस्तुनिष्ठता व वास्तववाद प्रतिष्ठित, सुंदर व उदात्तहि बनला होता.

थंड वास्तववाद कोणत्यातरी प्रकारच्या सहानुभूति व स्वीकृति खेरीज; शुष्क तपशील—त्याला सजीव करण्यासाठी औत्सुक्य या शिवाय; कला होऊं शकत नाही. अर्थात् सहानुभूति, हृदयाची ऊब आणि औत्सुक्य यांना सहायक असा एक वास्तववाद असूं शकतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शोध :

मनाचिया रथा
डोळीयांची चाके
आसवांची अश्वे. .ओढीतात

अशा रथातून
निघाला अेकला
सुख शोधायला. .दुख:राज

पापण्यांचे छत्र
असे शिरावर
कुणी शिरजोर. .होत नसे

पायघड्या पायी
भंगल्या आशेच्या
निर्माल्य फुलांच्या. .भविष्यात

मुजरे श्वासांचे
घेत जाअी पुढे
थांबुनिया थोडे. .विसावत

छेडिते विराणी
दूर आर्त गीत
नौबत झडत......हुंदक्यांची

जिथे जाअी तिथे
डोळीयात थेंब
दिसे प्रतिबिंब. .आपुलेच

पाहुनिया डोळा
स्वागत सोहळा
अंतरिचा मळा. .कळावला

उभ्या प्रवासात
सुखाचे दर्शन
नाहीच म्हणून....फिरे मागे

अश्वे नी चाकेहि
थिजता थकून
मातीत मिळून......राज्य गेले

म्हणे दु:खराज
असो अनवाणी
घालू गवसणी.....आकाशाला

मानिले मनाशी
मीच माझा राजा
मीच माझी प्रजा....हेच सुख

—मनोहर अपोनारायण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास:महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका खुळ्याची कहाणी

खोल पाताळाची गुहा
वर गुलाबाची शिळा
अशा अंधारउजेडी
एक राहातसे खुळा

खुळा भेटेना कुणाला
खुळा बोलेना कुणाशी
मात्र मिटूनिया डोळे
कधी हंसे तो स्वतःशी

आणि कोणे एके दिनी
असे अक्रीत जाहले
खुळा मिटूनिया ओठ
डोळे अश्रूत न्हालेले !

खुळा बोलेना कुणाशी
खुळा सांगेना कुणाला
आणि एके दिनी मग
खुळा मरूनिया गेला !

ऐसा एक खुळा आणि
त्याची इवली कहाणी
ऐकूनिया खोटेखोटे
नका डोळा आणू पाणी !!

—वसु भगत

अर्थ

निळ्या नभातले दृश्य
नयनांना त्रिलगले
माझ्या मनातले ध्यास
सुगंधित आज झाले—

पिचलेल्या भावनांना
तुझ्या प्राणांचा आसरा
शब्द अश्रूंना झेलाया
स्वप्नी श्वासाचा पसारा—

शुभ्र सुगंधित अश्रू
स्मरे स्वप्नाळू जीवन
माझे मलाच कळेना
तुझे क्षणाचे मीलन—

वाही दिशा गूंफूनिया
वाटा मलाच कळेना
आणि पाहूनिया सारे
स्वप्नी रडू आवरेना—

—माणिक भोयर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'सौभाग्याचा ठेवा'

पहाटेच्या गारव्यात
मन माझे धुंद झाले
अन् तुझ्या विळख्यात
अंग माझे सुखावले

प्रणयाची मादकता
नसानसात शिरली
वचनांची शब्दमाला
माझ्या ओठात रूळली

हृदयाच्या खोल जागी
खूण तुझी उमटली
रक्ताच्या कणाकणात
छाया तुझी पहुडली

तुझ्या पावलांची धूळ
माझ्या सौभाग्याचा ठेवा
भाव-पुष्पे उधळून
करणार तुझी सेवा

—म. ना. श्रीखंडे

अबोल वीणा—

ही अबोल वीणा
गाअिल कसले गीत ?

रागरागिण्या बसल्या रुसुनी
नकळत छेडुनि तार वीणेची
झालीरे, कंपित.....
—ही अबोल वीणा०

तार गळाले, शब्द विसरले
अुगाच ते मी बसले जुळवित
अुमटाया संगीत.....

—ही अबोल वीणा,
गाअिल कुठले गीत ?

—सुधीर देव

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

"नभोनाट्य आणि रंगनाटय"

—अनंत फाटक

रंगनाटय ! हा शब्द वापरतात की नाही कोण जाणे ! पण रंगमंचावर किंवा रंगभूमीवर जे नाटय पहावयास मिळते त्याला रंगनाटय म्हणावयास काय हरकत असावी ? म्हणूनच रंगनाटय ह्या शब्दाचा प्रयोग.

रंगनाटय आणि नभोनाटय ह्या दोहोत साम्य एवढेच की दोन्हीहि प्रकार हे नाटयच आहेत. दोन्हीहि प्रकार माणसाला संवेदनांनीच समजतात. या संवेदना कधी शारीरिक असतात तर पुष्कळदा मानसिक असतात. रंगनाटया-मध्ये शारीरिक संवेदना जास्त. तर नभोनाटयात मानसिक जास्त. हे विधान केले खरे, परंतु ते पटवून देणे तितकेसे सोपे नाही. कारण असे की हे विधान ज्याच्यासाठी केले आहे त्या सर्वांनाच जातीने समजावून सांगणे काही शक्य नाही. त्यातून एखादा कोणी प्रत्यक्ष भेटलाच तर त्याच्या व्यक्तिमत्वावर, त्याच्या अनभिज्ञतेवर आणि त्याच्या आकलनशक्तिवर ते पुष्कळसे अवलंबून राहील. इतके म्हटल्यावर थोडा वेळ या रंगनाटयाचा समाचार घेऊन त्याचे जरूर ते विश्लेषण करावयास पाहिजे ते असे.

रंगनाटय रंगभूमीवर होते, रंगभूमीवर दिसते. ते प्रेक्षागृहातून पहावे लागते आणि तेथूनच ऐकावे लागते. अर्थातच एखादेवेळी ते रंगभूमीच्या विंग-मधून पहाण्याची, ऐकण्याची संधि मिळते; अशी संधि अर्थातच सामान्य प्रेक्षकाला क्वचित् मिळावयाची. रंगनाटय म्हणजे रंगीत नाटय. ते कधी रंगलेले असू शकेल कधी नसेल. पण रंगनाटय हे खरोखरीच रंगीत नाटय.

मी म्हणतो रंगीत नाटय, म्हणजे काय ? म्हणजे असे की रंगनाटयाच्या प्रयोगाच्या वेळी रंगमंच किंवा रंगभूमी हीच केवळ रंगानं नटलेली नसते तर तिच्याबरोबर जी पात्रे त्या रंगनाटयात वावरत असतात ती सुद्धा रंगलेली असतात, ती नटलेली सोंगं असतात. त्यांच्या नेहमीच्या अस्तित्वापेक्षा, व्यक्ति-मत्वापेक्षा, ती निराळयाच तऱ्हेनं, रंगनाटयाला साजेल अशा रीतीनं, मुद्दाम नटलेली, नटवलेली असतात. म्हणून तर रंगनाटय रंगीत असते. त्या रंगाला दिव्यांच्या झगझगाटात कृत्रिम तेज आलेले असते. त्या तेजाला प्रेक्षक भाळलेला असतो. त्या तेजाने तो दिपलेला असतो. ते रंगलेलं रंगीत पात्र, त्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाट्यातील स्वभावपरिपोष, शब्दांनी, हावभावांनी, मुद्राभिनयाने एकसारखे करीत असते. किंबहुना त्या पात्राला तसे केल्यावाचून तरणोपायच नसतो. रंगमंचावरील त्या पात्राचा व्यवहार, हा सर्व व्यवहार प्रेक्षकावर योग्य तो परिणाम करण्यासाठीच असतो. प्रेक्षक स्थानबद्ध होऊन नेत्रसुख आणि श्रवण-सुख, संवेदनासुख आणि विचारसुख, सतत अनुभवीत असतो. जितकी प्रेक्षकाची रसिकता जास्त, जितका तो अधिक भावनाशील, तितका त्याला येणारा अनुभव अधिक. रसपरिपोष रंगमंचावरील त्या पात्राकडून झाला की नाही हे तो प्रेक्षक सदान्कदा ठरवीत असतो. या कार्यांत मग्न असताना त्याचे नेत्र, त्याची श्रवणेंद्रिये ही सतत काम करीत असतात. ह्या श्रवणसुखाच्या आणि नेत्रसुखाच्या एका विशिष्ट मीलनानंतरच त्याला सर्व प्रकारच्या भावनांच्या संवेदना होत असतात. प्रेक्षक जितका जास्त संवेदनक्षम तितका हा भावनोद्वेग प्रखर; त्याचे कान आणि डोळे, ह्यांनी कामे केल्यावाचून त्या रंगनाट्याची बहार त्याला समजावयाचीच नाही. पात्र आणि प्रेक्षक या दोघांनाहि कष्ट फार, परंतु त्या कष्टाशेवटी मन प्रसन्न करणारी संवेदना, आवाज जे कानाने ऐकू येतात ते, म्हणजे शब्द; संगीताचे स्वर आणि इतर आवाज; देखावा—म्हणजे रंगमंचावर दिसणारं दृश्य, ते पात्र किंवा पात्रे रंगभूमीवर आल्यानंतर बदलणारे दृश्य. पात्रावाचून बदलणारी दृश्ये, हे दोन्ही प्रकार एकाच वेळी त्या प्रेक्षकावर परिणाम करीत असतात.

नभोनाट्य हा प्रकार या रंगनाट्यापेक्षा फार वेगळा. नभोनाट्याला रंग-मंच लागत नाही. रंगमंचावरील सजावटीची त्याला जरूर नाही. त्यातील कलावंतांना रंगरंगोटी करावी लागत नाही. त्यांना अभिनय करावा लागत नाही. भावनातील फेरबदल रंगनाट्यातील पात्राप्रमाणे चेहऱ्यावर दाखवावे लागत नाहीत. थोडक्यात नभोनाट्यासाठी त्या कलावंताचे सोंग न नटलेलेच बरे. कलावंताबद्दल जे म्हटले तेच रंगमंचाबद्दल. जेथे या रंगमंचाचीच जरूरी नाही तेथे पडद्यांची, पडद्यावरील दृश्यांची, नेपथ्याची आणि त्याचबरोबर रंगमंदिराची किंवा प्रेक्षागृहाची सुद्धा जरूर नाही. मग हे नभोनाट्य घडते कुठे? हे नभोनाट्य त्या श्रोत्याच्या मनातील रंगमंचावर घडत असते. श्रोत्यांचे मन हेच नभोनाट्याचा रंगमंच. हा रंगमंच आयता तयारच असतो. केव्हाहि तयार असतो. त्याला वेळकाळाचे महत्त्व काही नाही. हे नभोनाट्य श्रवण करीत असतानाच क्षणाक्षणानं त्या नभोनाट्यातील घटना मनातील त्या रंगभूमीवर घडत असतात आणि त्या श्रोत्याचे मन, त्याला सोडून, एका विशिष्ट कल्पना-सृष्टीत वावरत असते. तो श्रोता केवळ कल्पनेनेच नभोनाट्य ऐकत असताना त्याला हवी तशी रंगभूमी तयार करीत असतो. त्याची कल्पना जितकी प्रखर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तितकी ही रंगभूमी आणि पात्रे त्याच्या मनातील रंगभूमीवर त्याच्या मनो-संवेदनाबरहुकुम नाचू लागतात, बोलू लागतात, चालू लागतात, गावू लागतात. ह्या सर्व गोष्टी त्याला दिसू लागतात. त्याने डोळे मिटले असले तरी दिसू लागतात. एखादे स्वप्न पहावे तसे. डोळे मिटून बसलेला हा श्रोता एका वेगळ्याच दुनियेत गेलेला असतो. आवाजाच्या दुनियेत. रेडीओ सेटवरून नभोनाटय सुरू झाले की त्याला आवाज ऐकू येतात; मानवी आवाज. स्त्री-पुरुष बालकांचे आवाज; या आवाजांबरोबरच, त्याला इतरहि आवाज ऐकू येतात. क्वचित् पदरव, क्वचित् गुणगुणणे, क्वचित् खोकला तर क्वचित् रुदन-तर क्वचित् हुंदके, एक ना दोन, नभोनाटयाची घडण ज्या आवाजाच्या मदतीने घडविली जात असते, ते सर्व आवाज, त्याला ऐकू येत असतात. आणि या आवाजाच्या साहाय्याने हे नभोनाटय आकाशवाणीवरून सादर केले जात असताना त्याला ऐकू येत असते. आणि त्याच्या मनाच्या रंगभूमीवर त्या नभोनाटयाचा प्रयोग चालू रहातो. ते नभोनाटय संपेपर्यंत. या आवाजाच्या दुनियेशी तो श्रोता जितका अधिक समरस होईल तितके ते नभोनाटच अधिक यशस्वी. हे नभोनाटच तयार करतांना ते दिसायला जितके सोपे तितकेच करताना अवघड. कारण अभिनयाची, रंगरंगोटीची, हावभावांची, रंगमंचावरील सजावटीची, दिव्याच्या रोषणाईची कोठल्याहि तऱ्हेची, बाहेरची मदत न घेता हे नभोनाटय केवळ मानवी आवाजाच्या साह्याने आणि मानवास ज्ञात असलेल्या इतर आवाजाच्या मदतीनेच तयार होत असते. नभोनाटयातील कलावंताचे हाल पुसू नका. त्याला केवळ त्याच्या आवाजानेच भावनाविष्कार करावा लागतो. त्याला अभिनयाची जोड नाही. त्याला हावभावांचा उपयोग नाही. त्याच्या रूपाचा प्रश्नच नाही. केवळ त्याचा आवाज. त्याचा आवाज हीच त्याची अमोघ शक्ति, त्याचा आवाज जितका जास्त लवचिक असेल, त्याच्या भावना त्याचा आवाज जितक्या सहजपणे योग्य-प्रकारे उद्गारू शकेल तितका तो कलावंत यशस्वी होईल. नळ सोडला म्हणजे पाणी कसे येते त्याप्रमाणे, तितक्या तत्परतेने, त्या कलावंताचा आवाज तोंडावाटे बाहेर पडला पाहिजे. पाहिजे तसा बाहेर पडला पाहिजे अर्थात् म्युनिसिपालीटीने पाणीच बंद केले असले तर नळाला पाणी तरी कोठून येणार ? त्याचप्रमाणे परमेश्वराने योग्य त्या आवाजाची देणगी दिली नसली तर तो माणूस, पुरुष अगर स्त्री, कलावंत होणार तरी कसे ? नभोनाटयासाठी, नभोनाटयाला उपयुक्त असा आवाज असणे ही पहिली जरूरीची गोष्ट. असा आवाज असूनहि, तो आवाज जरूर त्या भावना चट्दिशी, हव्यातेव्हां, पाहिजेतशा प्रगट करण्यात असमर्थ असेल तर त्या नुसत्या चांगल्या आवाजालाहि नभोनाटयाच्या क्षेत्रास किंमत कमीच.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कारण त्या नभोनाटयात कलावंताच्या आवाजाबरोबरच इतरहि गोष्टी लागतात, ज्या रंगनाटयालाहि लागतात. नभोनाटय चांगले असावे उत्तम रंगनाटयाप्रमाणे असावे. पण त्या नभोनाटयाची भाषा रंगनाटयाच्या भाषेसारखीच असली पाहिजे असे नाही. नभोनाटयाची भाषा ऐकताक्षणीच ऐकणाराला सहज समजेल अशी असावी, ती बोलायला सोपी असावी, त्यात अवघड–अवघड शब्द शक्य तितके कमी असावेत, भाषा उच्चारायला सोपी असावी. ह्या सोपेपणाबरोबरच ती भाषा भावनाप्रधान असायला पाहिजे. श्रोत्यांचे मनोरंजन करणारी असायला पाहिजे. त्याला ती ऐकावीशी वाटली पाहिजे. त्याच्या मनाची पकड घेणारी असायला पाहिजे. नभोनाटयास अनुरुप असा आवाज आणि बोलावयास सोपी अशी भाषा, उत्तम कथानक या तीन गोष्टी असल्या की नभोनाटय हटकून यशस्वी होतेच. बाकीचे अलंकार कधीमधी त्या नभोनाटयावर चढवावे लागतात, ते केवळ त्या नभोनाटयाचे श्रवणरुप मनोहर व्हावे म्हणूनच. परंतु या अलंकारावाचूनहि नुसत्या मानवी आवाजाने नभोनाटय श्रवणसुंदर होऊ शकते.

नभोनाटयावर अशा मर्यादा असल्यामुळे, त्या नभोनाटयाच्या सादरकर्त्याला एका नवीन तंत्राचा अवलंब करावा लागतो. याला नभोनाटयतंत्रच म्हणतात. हे रंगनाटयतंत्रापासून फार वेगळे. विशिष्ट मर्यादेतच काम करावे लागत असल्यामुळे फक्त श्रवणसुखासाठी ज्याची निर्मिति, असे हे नभोनाटयतंत्र शिकण्यास आणि ते शिकून त्यावर प्रभुत्व मिळविण्यास पुष्कळ काळ लागत असला तर त्यात काय नवल ?

नभोनाटय सादर करताना रंगभूमी विसरावी लागते. हे कांही फारसे शक्य नाही. परंतु रंगनाटयातील आवश्यक असलेल्या, नाटककाराने लिहिलेल्या पुष्कळशा गोष्टी, निराळयाच पद्धतीने नभोनाटयात सुचवाव्या लागतात. रंगमंचावरील पात्रांची हालचाल, ही स्टुडीओमधील ध्वनिक्षेपकाभोवती व्हावी लागते. नभोनाटयातील प्रत्येक पात्र, संवादातील त्या दुसऱ्या पात्राशी न बोलता ध्वनिक्षेपकाशी बोलत राहाते. ध्वनिक्षेपकापासून अधूनमधून बदलणारे त्या पात्राचे अंतर हीच त्या पात्राची हालचाल, त्या पात्राचे लाजणे, हात वर करणे, भिवया वर चढवणे, या सर्व गोष्टींचा, रंगमंचावरील अर्थ आणि दर्शन ह्याचे शब्दात रुपांतर करावे लागते. उदाहरणार्थ नभोनाटयातील एखदे पात्र लाजले, रागावले तर ते दुसऱ्या पात्राकडून शब्दात सुचवावे लागते. लाजायला काय झालं ? रुसायला काय झालं ? असे त्या पात्राला म्हणावे लागते. कारण ते लाजलेले रुसलेले पात्र घरी बसलेल्या श्रोत्याला कसे दिसणार ? पण शब्दसूचित हा अभिनय आणि भावनांचे प्रदर्शन श्रोत्यांना तावडतोब समजते, कारण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वत: लाजणे, रुसणे, आणि दुसऱ्याला लाजलेले रुसलेले पाहाणे हा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भागत्र आहे.

ह्या अशा आणि इतर पुष्कळ गोष्टी नभोनाटचतंत्रामध्ये येतात. त्या अभ्यासाव्या लागतात. अभ्यासाने आणि अनुभवाने या तंत्रातील इंगिते समजू लागतात. असे असते हे नभोनाटच आणि नभोनाटचतंत्र. रंगनाटचाहून जवळ जवळ अजिबात वेगळे. ज्या अनेक ललितकला आहेत, त्या ललितकलात गेल्या पन्नास वर्षात ज्या नवीन आकर्षक कलेची भर पडली आहे ती ही ब्रॉड-कास्टिंगची कला. संगीत, नृत्य, चित्र वगैरे कलांचा जसा अभ्यास करावा लागतो, मेहनत करावी लागते, तशीच या कलेकरिताहि करावी लागते. त्यातल्या-त्यांत नभोनाटचाची कला ही रंगनाटच आणि बोलपट या दोहोंच्यामध्ये येऊन बसली आहे. या कलेने कलाप्रेमी लोकांच्यासाठी एक नवीन कलेचे दालन खुले केले आहे. याहि कलेत प्राविण्य मिळवितां येते. ते रियाजावर अवलंबून असते.

विदर्भ साहित्य संघाचे वर्गणीदार व्हा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

परिचय–परामर्श

माझी जीवनकथा

लेखक : गंगाधरराव देशपांडे
प्रकाशक : मौज प्रकाशन गृह, मुंबई ४
पृष्ठे ४५२ किंमत १५ रुपये

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात गेल्या ४० वर्षापासून शिरलेले अहंनिष्ठतेचे वारे आज किती अनावर झाले आहे याची जाणीव मराठीच्या सुबुद्ध वाचकांना आहेच. या अहंनिष्ठतेने आत्मनिष्ठेचे गोंडस नांव धारण केले आहे. आत्माविष्कार हीच वाङ्मयनिर्मितीची प्रेरणा मानली आहे. स्वतःच्या संवेदनांशी प्रामाणिक राहणे व स्वतःच्या अल्पशा अनुभवाचे माहात्म्य गाणे हेच तिने आपले कार्य मानले आहे. "अहंकाराचा वारा न लागो राजसा" म्हणणारे टीकाकार आता 'जुने' ठरले आहेत. मरेपर्यंत स्वतःबद्दल काही बोलू नये असे म्हणणाऱ्यांची अभिजातता आता हास्यास्पद झाली आहे. 'माणसाला एकतरी कथा वा कादंबरी लिहिता येईल.' अशा पोकळ विनवुडाच्या तत्वाला भलताच भाव आला आहे. ललितवाङमयातील कथा आणि काव्य, चरित्रे आणि निबंध, या सारख्या वाङमयप्रकारात आत्मनिष्ठेचे प्रबल आवर्त तयार होऊ पहात आहे. आत्मचरित्रातील 'मी' आणि ललितवाङ्मयातील 'मी' याची मराठी वाचकांशी दिवसें दिवस इतकी घनिष्ट सलगी होऊ पहात आहे की या 'मी' पणाचे ओझे मराठी वाङ्मयाला भारभूत तर होणार नाही ना अशी जाणत्या रसिकांना काळजी वाटावी.

चरित्रलेखकाची 'अभिजात' वृत्ति

गंमत अशी की आत्मनिष्ठ समजल्या जाणाऱ्या आत्मचरित्रासारख्या वाङमयप्रकारात गेल्यावर्षी एका सुंदर पुस्तकाची भर पडली आहे. कर्नाटकसिंह म्हणून गाजलेले बेळगांवचे सुप्रसिद्ध पुढारी कै. गंगाधररावजी देशपांडे यांनी लिहिलेली ही आत्मकथा आहे. सन १९०६ पासून लो. टिळकांच्या आणि पुढे १९२० पासून म. गांधींच्या राजकारणात त्यांचे एक सहकारी म्हणून राजकीय चळवळीत ते पुढे आले. गंगाधररावांची देशभक्ति आणि कार्यरतता ही

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निदान जुन्या पिढीला सांगायला नको इतकी ती परिचयाची आहे. पण श्री. गंगाधररावजींच्या आंगचा 'आभिजात्य' हा गुण फारच थोड्यांच्या परिचयाचा असेल. मरेपर्यंत स्वत:बद्दल कांही बोलू नये असे मानणाऱ्या गोखले टिळकांच्या पिढीचा आदर्श त्यांच्यापुढे होता आणि अशा आदर्शावर त्यांच्या मनाचा पिंड पोसला गेला. त्यामुळे आत्माविष्कारापेक्षा आत्मविलोप हीच त्यांच्या मनाची प्रकृति राहिली. त्यांच्या जवळच्या स्नेहीजनांनी त्यांना आपले अनुभव ग्रथित करण्याची पुन: पुन्हा विनंति केली नसती तर गंगाधररावजींनी आपली ही जीवनकथा लिहिली असती असे मला तरी वाटत नाही. गंमत अशी की ज्या आत्मविलोपाच्या वृत्तीमुळे त्यांनी प्रथम प्रथम ही आत्मकथा लिहिण्याची टाळाटाळ केली त्याच वृत्तीमुळे लिहिल्यानंतर ती लवकर प्रकाशात न येऊ देण्याचीहि खबरदारी घेतली आणि म्हणूनच १९३२ च्या तुरुंगवासात लिहावयास घेतलेली ही कथा जवळजवळ ३० वर्षांनंतर आज मराठी वाचकांसमोर येत आहे. 'जे लिहिले ते छापले' अशा भाऊगर्दीच्या काळात स्वत:च्या लेखनासंबंधीची ही उदासीन वृत्ति मोठी दुर्मिळ आहे. या वृत्तीलाच मी 'आभिजात्य' म्हणतो. आणि गंगाधररावजींच्या मनाचे हे आभिजात्य या दृष्टीने मला आदरणीय वाटते.

महाराष्ट्रीय जीवनाचे दर्शन

पण या 'आत्मविलोपी' वृत्तीचा एक निश्चित फायदा आपल्यासारख्या वाचकांच्या पदरात पडत असेल तर तो म्हणजे साधारण शंभरवर्षांपूर्वीचे महाराष्ट्रीय जीवनाचे ओझरते आणि अंधुक कां होइना दर्शन आपल्याला होऊ शकते. तत्कालीन महाराष्ट्रातील जीवनाची जी कांही थोडीफार अंगे या चरित्रात आपल्या डोळ्यापुढे येतात ती आजच्या पिढीला नवीन आणि मनोरंजक वाटतील पण तितकीच ती उद्बोधकहि ठरतील.

इंग्रजांचा पूर्ण अंमल बसेपर्यंतच्या काळात चोरट्यांची कशी धामधूम होती आणि प्रजेमधे मधून मधून कशी 'घबराहट' उत्पन्न होई याचे चित्र सुरवातीच्या प्रकरणात गंगाधररावांनी दिले आहे ते पाहण्यासारखे आहे. खुद्द गंगाधररावजींच्या पणजोबांना रात्री निजतेवेळी म्यानातून तलवार बाहेर काढून अंथरुणा जवळ ठेवून निजण्याची दक्षता घ्यावी लागत असे. ही अस्वस्थता नाहीशी करण्यात इंग्रजी राज्याचे जे सहाय्य प्रजेला मिळत गेले ते त्यांना अपूर्व वाटावे आणि त्याबद्दल त्यांनी राज्यकर्त्यांना दुवा द्यावा हे साहाजिकच होते. गंगाधररावजींच्या बाल्यकाळात तर हळुहळु सुधारणेची पदचिन्हे उमटू लागली होती. टपाल आणि रेल्वे यांची वाहतुक सुरु झाली होती. दळणवळणाची साधने वाढली. सुरक्षितता आली आणि मध्यमवर्गीय सुशिक्षितांचे जीवन तर संपन्नतेने जणु दरवळून निघाले; आणि बहुधा यामुळेच सामान्यांच्या मनावर राज्य-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कर्त्यांच्या दयाळुपणाची छाप विशेष पडली. मध्यमवर्गीयांच्या जीवनात तर इंग्रज अधिकाऱ्यांच्या सान्निध्याचा आणि शिक्षणाचा विशेष प्रभाव पडला. खुद्द गंगाधररावजी आपल्या कॉलेज जीवनाविषयी लिहितात–

> "युरोपियन लोकांची राहणी, त्यांचा पहेराव त्यांच्या जेवण्याखाण्याच्या रीतीभाती आमच्यापेक्षा श्रेष्ठ असे मला कांही दिवस वाटू लागले होते. पोक्तपणे विचार करून मी ठरवले होते अशातील प्रकार नव्हता. त्यात अनुकरण करण्याचीच इच्छा जास्त होती. पाश्चात्य पद्धतीचे चांगले कपडे वापरण्याची माझ्यामधे आवड उत्पन्न होऊन त्याप्रमाणे मी तसे कांहीतरी करीत होतो. पण ही स्थिति फार दिवस टिकली नाही." (पृ. ८१; प्र. ५)

मध्यमवर्गाच्या जीवनातील परिवर्त

गंगाधररावजींच्या आत्मकथेत मध्यमवर्गीय जीवनातील परिवर्तांचे चित्रण अर्थात विशेष आले आहे. आणि त्यातील प्रामाणिक व प्रांजळ निवेदनामुळे ते बरेचसे चटकदार झाले आहे. घरातील बालविधवांना पोथ्यापुस्तके वाचण्या इतपत मराठीचे शिक्षण कसे मिळत असे (पृ. १३) शाळाखात्यातील नोकरीचा दर्जा इतर नोकरपेशाच्या मानाने कसा अप्रतिष्ठित व कमी दर्जाचा वाटे (पृ २१) साधारण मध्यमस्थितीतील माणसात अंगवस्त्रे ठेवण्याची आणि पानसुपारीसारख्या साध्या प्रसंगातहि नाचगाणे ठेवण्याची प्रथा कशी असे (पृ २३) कोर्टातल्या वकीलांना उद्देशून वरिष्ठ साहेब प्रसंगी 'यू फूल' म्हणण्यास कसं कमी करीत नसत आणि त्याबद्दल 'यस सर' म्हणून त्याकाळातले वलीलहि कसा आदबीने मुजरा करीत साधारण प्रतिष्ठित माणसाला कैदेची शिक्षा न देता दंडावरच भागविण्याची आणि एखाद्या नवख्या वकीलांना 'केस' मिळवून देण्याची इंग्रज अधिकारी कशी खटपट करीत यांची गंगाधररावांनी केलेली वर्णने मुळातच वाचण्यासारखी आहेत. या वस्तुस्थितीचे निवेदन करताना लेखकाने आपल्या कौटुंबिक जीवनाची माहिती बऱ्याच प्रांजळपणाने दिलेली आहे सुधारक कुटुंबात वावरल्यामुळे स्त्रियांशी वागण्यात येणारा मोकळेपणा पण वेळगाव सारख्या शहरात एखाद्या ओळखीच्या प्रतिष्ठित स्त्रीलाहि बायकोच्या बरोबरीने शहर दाखविण्यासारख्या कामात येणारे संकट आणि कौटुंबिक जीवनात विशेषत: दांपत्य जीवनात त्यामुळे पदोपदी होणारा विरोध या लेखकानी सांगितलेल्या गोष्टी सामाजिक मनाचे चित्रण तर दाखवितातच पण त्याबरोबरच सुधारक मनाच्या अंतर्विरोधाचे जे चित्र त्यातून मिळते ते विशेष हृद्य आणि उद्बोधक ठरेल असे आहे.

दांपत्यजीवनातील अंतर्विरोध

सुरवातीच्या चारपांच प्रकरणात आपल्या कॉलेजजीवनाचे आणि वकिलीच्या व्यवसायातील अनुभवाचे गंगाधररावानी वर्णन केले म्हणजे नव्या आशा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आकांक्षानी वहरून आलेल्या आणि कर्तबगार जीवनाची प्रभात पाहण्यास उत्सुक झालेल्या त्यांच्या मनाचे डोळ्यापुढे जणु उभे राहते. पण या सुशिक्षित आणि कर्तबगार तरुणाचे दांपत्यजीवन मात्र कधीच सुखाचे झाले नाही. आपल्या दांपत्यजीवनाचे गंगाधररावानी जे वर्णन केले आहे ते पाहिले म्हणजे त्यात सुसंगतीपेक्षा विरोधच जास्त दिसतो. आपल्या कॉलेजच्या जीवनात सुधारक मित्रांचा सहवास त्यांना घडला होता इतकेच नव्हे तर आपल्या एका मित्रामुळे एका सुधारक कुटुंबात मोकळेपणाने वावरायलाहि त्यांना मिळाले होतें. कुटुंबात बायकांनी आणि पुरुषांनी मिळूनमिसळून वागणे, नवराबायकोने मोकळेपणाने एकमेकाशी बोलणे या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्याचा आणि अनुभवण्याचा योगहि आला. आपल्या घरीहि अशी सुधारणा व्हावी असे त्यांच्या तरुण मनाला वाटले तर ते साहजिकच होते. पण हे वाटणे मनातल्या मनातच राहिले. प्रत्यक्षांत ते उतरण्याचा योग कधी आला नाही. याचे कारण सांगताना गंगाधररावजी काहीशा विषादाने लिहितात.

> "बायकोने लिहावयाला व वाचावयाला शिकावे म्हणून मी प्रयत्न केला. पण यश आले नाही. बायकांनी लिहिण्याला आणि वाचण्याला शिकल्यास सरस्वतीदेवीचा शाप होता असे मला बायकोकडून स्पष्टीकरण मिळाले. यानंतर मी हा नाद सोडला."

अंतर्विग्रहाची मार्मिक मीमांसा

घरातील या अंतर्विग्रहापेक्षा मनात जो दारुण अंतर्विग्रह होत होता त्याचे चित्र गंगाधररावांनी याहून फारसे भडक काढलेले नाही. किंबहुना गृहसौख्यात बाधा आणणाऱ्या या गोष्टींबद्दल त्यांनी आपल्या पत्नीला दोषहि दिलेला नाही. परंतु तत्कालीन तरुण मनाच्या अंतर्विरोधाची त्यांनी जी मीमांसा केली आहे ती पाहिली म्हणजे गंगाधररावजींचे एकंदर दांपत्यजीवनाबद्दलचे मत काय आहे ते कळून येते. ही त्यांची मीमांसा मोठी मार्मिक आहे.

> "नवीन पाश्चात्य वाङ्मय वाचून मनावर एक प्रकारचे परिणाम तर घरची स्थिति व व्यवहार अगदी याच्या उलट अशा कैचीत तरुण सापडले आहेत. जुन्यातले चांगले व वाईट यांची निवड करून चांगले ठेवण्याचा प्रयत्न करणेहि होत नाही आणि नवीन सर्वच चांगले घेतले तरी त्याप्रमाणे वागता येत नाही. अशा कचाटीत आमचा सुशिक्षित म्हणवून घेणारा मध्यमवर्ग सापडला आहे. या स्थितीचे परिणाम अनिष्ट होणारच व त्याप्रमाणे माझ्यावरहि झाले. (पृ. ७२)"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोकमान्यांचे असामान्यपण

अशा सुधारकी विचाराचे आणि सुरवातीला लोकमान्यांच्या राजकीय कार्यावर टीका करणारे गंगाधरराव पुढे १९०६ नंतर लोकमान्यांचे एकनिष्ठ अनुयायी बनणे हा खरोखर विरोधाभासाचा एक नमुनाच म्हणावा लागेल. पण १९०६ सालापासून राजकीय वातावरणात वंगभंगाच्या आंदोलनानंतर जे एक उग्र रूप आले ते तरुण युयुत्सु मनाला आकर्षक वाटावे असेच होते आणि नेमका हाच विशेष गंगाधररावांच्या स्वातंत्र्यप्रिय अंतःकरणाला आकर्षित करणारा ठरला असावा. लोकनायक अणे यांनी या ग्रंथाला लिहिलेल्या आपल्या प्रस्तावनेत 'मेंढयाच्या कळपातील सिंहाचा बच्चा' असे जे गंगाधररावांचे वर्णन केले आहे ते खरोखरच मार्मिक आहे.

खुद्द लोकमान्यांच्या सहवासात आल्यानंतर गंगाधररावांचे त्यांच्याविषयीचे पुष्कळसे भ्रम निवळले आणि लोकमान्यात खरे पुढारीपणाचे असामान्य गुण असल्याचे त्यांच्या प्रत्ययाला आले. टिळकांच्या अंगच्या पुढारीपणाची कारण-मीमांसा त्यांनी मथून मथून केली आहे. त्यातील एक नमुना पाहण्याजोगा आहे. पंजाबातील वीरनवाली नांवाच्या स्त्रीवर अत्याचार झाल्याची वार्ता लोकमान्यांना बेळगावात असताना ऐकायला मिळाली तेव्हा रात्रभर त्यांच्या डोळ्याला डोळा लागला नाही. या प्रसंगाचे वर्णन गंगाधररावांनी सुंदर केले आहे. लोकमान्यांच्या या प्रसंगीच्या वर्तनाने गंगाधररावांच्या मनावर कोणता संस्कार उमटला त्याविषयी गंगाधरराव लिहितात:—

> "हिंदुस्थानातील लोकांच्या अन्नाबद्दल त्यांच्या गरिबीबद्दल त्यांच्या सर्व प्रकारच्या हीनदीन स्थितीबद्दल पुढाऱ्यामध्ये एकात्मता उत्पन्न झाल्याखेरीज राष्ट्राचे काम त्यांच्या हातून यशस्वी रीतीने होणार नाही ही कल्पना आज माझ्याच अनुभवाने दृढमूल झाली आहे. पण तिचा उगम बेलम्होंगलास टिळकांच्या त्या दिवशीच्या वृत्तीमुळे झाला." (पृ. १३२)

रहस्यकथेलाहि लाजवणारे प्रसंग

लो. टिळकांच्या सान्निध्यात आल्यानंतर गंगाधररावांना राजकीय वातावरणात लवकरच वरचे स्थान मिळालेले दिसते. टिळकांचे मार्गदर्शन त्यांना लाभले.

लो. टिळकांना १९०८ साली पुन: तुरुंगवास झाल्यानंतर या राष्ट्रीय चळवळीची प्रगति बरीच मंदावली. इतकेच नव्हे तर या राष्ट्रीय पक्षातील टिळक भक्तांनाहि येनकेन प्रकाराने कुठल्यातरी कटात अडकावून त्यांना खोड्यात अडकवण्याची कारस्थाने कशी झाली आणि त्यात गंगाधरराव सारख्यांच्याहि गळयाला फास लागण्याची वेळ कशी आली याची रोमहर्षक वाटणारी वर्णने या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तकात क्र. ८ ते १० पर्यंतच्या तीन प्रकरणात आली आहेत. कोल्हापूरच्या छत्रपतींनी एका कटात त्यांना गोवण्याचे प्रयत्न कसे केले व त्यातून ते युक्ती-प्रयुक्तीने नेहमी कसे निसटले, स्वदेशी बँक स्थापण्याच्या व 'राष्ट्रमत' वर्तमान-पत्राच्या बाबतीत त्यांना कसे अनुभव आले आणि एका प्रसंगी खुनाच्या खटल्यात तर त्यांच्यावरच खुनाचा आरोप येण्याचा प्रसंग कसा आला याची या तीन प्रकरणात दिलेली माहिती एखाद्या रहस्यकथेलाहि लाजवील अशी आहे. त्याची लज्जत घेण्यासाठी वाचकांनी मूळ चरित्रग्रंथाकडेच वळायला हवे.

टिळक युगात रमलेले गंगाधरराव पुढच्या गांधीयुगात त्या युगपुरुषाच्या प्रभावाने कसे भारून गेले याचे चित्रण सतराव्या प्रकरणापासून तो शेवटच्या तेविसाव्या प्रकरणापर्यंत केलेले आहे. लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांच्या साहाय्यकात कशी दुफळी माजली हे सर्वश्रुतच आहे. पण या दुभंगलेल्या जीव-नाच्या काळात गंगाधरराव मात्र शेवटपर्यंत गांधीजींच्या कार्याशी समरस होते आणि गांधीजींचा विश्वास त्यांनी संपादन केलेला होता. शेवटल्या आठ प्रकरणात गंगाधररावजींनी गांधीयुगातील राजकीय हालचालींचे, तत्कालीन कॉंग्रेस नेत्यांचे, निरनिराळ्या कॉंग्रेसच्या बैठकीचे जे चित्र काढले आहे ते कॉंग्रेसच्याच नव्हे तर गांधीयुगाच्या इतिहासाचे एक पर्व म्हणून वाचनीय ठरेल. या इतिहासातील गंगाधररावांचे कार्य त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर "टिळकांच्या पश्चात हिंदी राजकारणाची मुख्य सूत्रे गांधीजींच्या हाती गेली त्यावेळी व तेव्हापासून आजपर्यंत गांधींशी मी यथाशक्ति सहकार्य करीत आलो."

भिन्न रुचीच्या वाचकांची तृप्ति करण्याचे कार्य करणारे वाङ्मय सर्वश्रेष्ठ मानावयाचे झाल्यास गंगाधररावजींची ही जीवनकथा निश्चितपणे त्या कसोटीला उतरावी अशीच आहे. पण ग्रंथ वाचून संपविताना पुढल्या ११२४–२५ साला-नंतरच्या काळाची कथा केव्हा वाचायला मिळेल अशी हुरहूर लागल्याशिवाय राहत नाही. पण दुर्दैवाची गोष्ट ही की ही हुरहूर आता अशीच कायम राहणार आहे. कारण ही 'जीवनकथा' प्रसिद्ध होत असतांनाच गंगाधररावजी इहलोक सोडून गेले. या दृष्टीने पाहता ग्रंथसिद्धीचा हा सोहळा अपूर्व तर खराच पण तितकाच विषादजन्य हुरहूर उत्पन्न करणारा आहे.

भा. श्री. परांजपे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चंद्र नभीचा ढळला

लेखक–पु. व्यं. दारव्हेकर. जयहिंद प्रकाशन, मुंबई २,
मूल्य २ रुपये. पृष्ठे १११

श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे हे गाजलेले नाटक. हे नाटक गाजले ते दोन अर्थांनी!—उत्तम नाटके कुशलतेने सादर करावीत ती पुण्या-मुंबईकडील नाट्यसंस्थांनीच हा आजपर्यंत सामान्यत: सर्वत्र रूढ असलेला दंडक नागपूरच्या रंजन कला मंदिराने मोडून टाकला तो श्री. दारव्हेकरांच्या या नाटकाच्या प्रयोगानेच! १९६०–६१ च्या महाराष्ट्र–राज्य–नाट्यमहोत्सवात लेखन व प्रयोग या दोन्ही विषयात हे नाटक सर्वोत्तम ठरले आणि श्री. दारव्हेकर, त्यांचे हे नाटक आणि 'रंजन कला मंदिर' ही नाट्यसंस्था यांच्यावर प्रसिद्धीचा झगझगीत प्रकाशझोत पडला!—नाटक गाजण्याचे हे एक कारण! दुसरे कारण म्हणजे, या नाटकाच्या संबंधात टीकाकारांनी उडविलेली कठोर टीकेची राळ!—प्रस्तावनेत लेखकाने आलबट कामू या फ्रेंच नाटककाराच्या 'कॅलीगुला'चा उल्लेख प्रामाणिक-पणे केला व हेच सूत्र घेऊन प्रस्तुत नाटक हे श्री. दारव्हेकर यांनी 'कॅलीगुला' वरून सहीसही चोरले, अशी टीकाकारांनी हाकाटी केली. टीका व प्रतिटीका यांची अशी फैर आधुनिक काळांत याच एका मराठी नाटकाच्या संबंधात झडली असावी!

वास्तविक 'कविता आणि कौमुदी' या शीर्षकाखाली नागपूर आकाशवाणी केंद्रावरून श्री. दारव्हेकर यांनी एक श्रुतिका सादर केली होती. त्या श्रुतिकेचेच नाट्यरूपांतर करताना 'कॅलीगुला'च्या प्रभावाखाली लेखकाची नाट्यप्रतिभा सापडली. स्वत: दारव्हेकरच 'माझे हे नाटक म्हणजे आल्बर्ट कामू (की कॅमस?) या श्रेष्ठ फ्रेंच नाटककाराच्या 'कॅलीगुला' या नाटकाचा अनुवाद नव्हे. परंतु-ही माझी 'पूर्णत: स्वतंत्र' कलाकृति तरी कसं म्हणू मी?—कारण माझ्या 'सम्राट चंद्रकुमारानं 'कॅलीगुला'पासून प्रेरणा घेतली हे मी प्रांजलपणे मान्य करतो. असं सरळ सरळ सांगतात. ते नाकारून श्री. दारव्हेकर यांनी 'कॅली-गुलाची केवळ उसनवारी केली' असं पुन्हा पुन्हा म्हणत राहणे यात टीकाकाराच्या सत्यान्वेषी भूमिकेपेक्षा हटवादीपणाचाच भाग अधिक आहे, असेच कुणाच्याहि प्रत्ययास येईल! कॅलीगुला' व 'चंद्र नभीचा ढळला' यांची सविस्तर तुलना करणं या दृष्टीनं उचित ठरेल. तथापि स्थलाभावी ते इथे शक्य नाही. मात्र तुलना केलीच तर कॅलीगुलापेक्षा निदान ९० टक्के तरी हे नाटक स्वतंत्र आहे, हे सहज सिद्ध होऊं शकेल!—मूळ कॅलीगुलात नसलेली अनेक स्वतंत्र पात्रे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपणाला दारव्हेकरांच्या नाटकात आढळतात. केवळ कांही कल्पनातील वा वाक्यातील साम्य ध्यानात घेऊन वाङ्मयचौर्याचाच आरोप करायचा तर 'भाऊबंदकी' किंवा 'सवाई माधवराव यांचा मृत्यु' ही नाटके लिहिणाऱ्या नाट्याचार्य खाडिलकरांनी शेक्सपीयरच्या हॅम्लेट–ऑथेल्लो किंवा मॅक्बेथ या नाटकांवरच आपल्या नाट्यलेखनाची इमारत उभी केली आहे असे म्हणून त्यांच्या नाट्यलेखन कर्तृत्वाविषयीच संशय घ्यावा लागेल !

प्रस्तुत नाटकाचे वर्णन करिताना ते "प्राचीन भारतातील 'सामंत'कालीन तीन अंकी नृत्य–संगीतयुक्त (पूर्णत: कल्पित) ऐतिहासिक नाटक" अशी शब्द योजना लेखकाने केलेली आहे. ऐतिहासिक नाटक म्हणताच इतिहासात प्रत्यक्ष घडून गेलेल्या कोणत्या ना कोणत्या सत्य घटनेचा आधार या नाट्यवस्तूला असावा, अशी कल्पना निर्माण होते. ती कल्पना योग्य नाही, हे सांगण्यासाठीच 'कल्पित' असा शब्दप्रयोग येथे लेखकाने केलेला आहे ! ऐतिहासिक वातावरणाची निर्मिति होईल अशा स्वरूपाचे हे कथानक असले तरी त्याला इतिहासात काडीचाहि आधार नाही ! म्हणूनच हे नाटक, कॅलीगुलाचा अंशत: आधार असल्यामुळे पूर्णत: स्वतंत्र जरी नसले तरी ते सत्य नसल्याने पूर्णपणे कल्पित आहे असे लेखकाचे म्हणणे आहे.——आणि ते खरे आहे. वृत्तीने कलासक्त असलेल्या चंद्रकुमारावर अलकावतीचे सम्राटपद लादले जाते. चंद्रकुमाराचे कौमुदीवर आत्यंतिक प्रेम असल्याने त्या प्रेमासाठी सम्राटपदावर लाथ मारायला ते सिद्ध असतात. परंतु राज्याच्या कल्याणाकरिता श्वेतकेतु महाराजांच्या निधनानंतर चंद्रकुमारांनी सम्राटपद स्वीकारणे आवश्यक ठरविले जाते व त्या मार्गात आपली अडचण असू नये यामुळे राज्यारोहणाच्या आदल्या दिवशी कौमुदी आत्महत्या करते!——सम्राटांच्या मनावर या घटनेचा विलक्षण परिणाम होऊन ते जवळ जवळ वेडयासारखे वागू लागतात थंडीवारा किंवा इतर अडथळे न जुमानता प्रणयभंगाचे दु:ख विसरण्यासाठी ते भटकतात. राज्ययंत्राकडे दुर्लक्ष करू लागतात. आपल्या हाती आलेल्या अमर्याद सत्तेचा हवातसा वापर करू लागतात. राज्यातला पैसा खर्च करून चंद्रापर्यंत जाता येईल असा चंद्रसोपान तयार करण्याच्या मागे ते लागतात व सर्व राज्यात हाहा:कार सुरू होतो. सम्राटाच्या अस्तित्वाचीच अडचण निर्माण होते. महामंत्री व अन्यमंत्री यांचे सारे अधिकार सम्राट काढून घेऊन त्यांना शोभेची बाहुली करून सोडतात आणि त्यामुळे सम्राट व महामंत्री यांच्यात संघर्ष सुरू होतो. या संघर्षाची कल्पना सम्राटालाहि असते. परंतु, स्वत:ला वाचविण्याची कांहीच धडपड ते करीत नाहीत. कंदुक हा विदुषक आणि दासी सुवर्णा यांच्याखेरीज सर्वजण सम्राटांना विरोध करतात आणि या संघर्षात अखेर सम्राटांच्या करणीने दुखविलेल्या गेलेला सामंत मलयगुप्ताच्या आकस्मिक हल्याने सम्राट मरण पावतात.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाटकाचे हे कथानक. सम्राटाची चंद्रसोपानाची कल्पना अवास्तव असल्याचे केवळ नाट्यकथानकातील पात्रांनाच नव्हे, तर प्रेक्षकांनाहि वाटत राहते. तथापि कौमुदीच्या मृत्यूने त्याला बुद्धिभ्रंश होणे स्वाभाविक असल्याने त्या कल्पनेचे समर्थन करता येईल. मात्र एरवी, अत्यंत सहृदय, कविप्रकृतीचा व उदार-मनस्क असा हा सम्राट अनेकांना ठार मारतो, हे मनाला पटत नाही! –माझ्या राजवटीत एकहि युद्ध झाले नाही. युद्धात लक्षावधि लोक मरतात. मग माझ्या महत्त्वाकांक्षेसाठी काही लोकाना ठार मारण्यात आले तर त्यात बिघडले काय ? हा सम्राटांचा युक्तिवाद तर्कदृष्ट्या बिनतोड वाटला तरीहि सम्राटांच्या उज्ज्वल व्यक्तिचित्रावर हा व्यर्थ कलंक आहे, असे वाटत राहते.

या ठिकाणी समग्र नाटकाचे सांगोपांग परीक्षण करणे अर्थातच शक्य नाही. तथापि सम्राटांची अनाकलनीय भूमिका वाचकांना नाटकाच्या अंतापर्यंत खेचीत नेते हे निर्विवाद सत्य आहे. कथानकापेक्षाहि श्री. दारव्हेकर यांची प्रभावी भाषा आणि व्यक्तिरेखाटनाचे कौशल्य यांनीहि नाटकाच्या यशाला फार मोठा हातभार लागला आहे. 'कॅलीगुला' नाटकात अजीवात नसलेले 'कंदुकशर्मा' हे एकच पात्र अत्यंत रेखीव, परिणामकारक व म्हणूनच श्री. दारव्हेकर यांच्या स्वतंत्र नाट्यनिर्मिति सामर्थ्याचे प्रत्यंतर आणून देणारे असे वाटते. सम्राट व विदूषक यातील भेद व्यक्त करताना 'विदूषक गंभीर बोलला तरी लोकांना तो विनोदच वाटतो, उलट सम्राटांनी विनोद केल्यास त्याचे परिणाम फार गंभीर होतात' अशी वाक्ययोजना कंदूक अगदी सहजतेने करतो. अमात्य म्हणतात त्याप्रमाणे, कंदुकशर्मा हा नुसताच विदूषक नाही, तत्त्वज्ञानीहि आहे. असा हा तत्त्वज्ञानी विदूषक श्री. गणेश सोळंकी यांनी अत्यंत प्रभावीपणे रंगभूमीवर अभिव्यक्त करून दाखविला आहे.

कंदुकाप्रमाणेच सम्राट चंद्रकुमार (राजा पाठक) राजकुमारी रोहिणी (आशा दातार), सुवर्णा (नलिनी शर्मा), महामंत्री चतुरसेन (अरविंद पाठक) यांची कामेहि अत्यंत प्रभावी वाटतात. श्री. दारव्हेकरांचे दिग्दर्शन आणि एकूण १८ पात्रांचा संघटित अभिनय यांचा सांधा फारच सुंदर रीतीने जुळल्याचा प्रत्यय हे नाटक पाहताना येत असतो. श्री. दारव्हेकरांचे हे नाटक सौ. सुधा करमकर यांच्या व्यावसायिक रंगभूमीने आता स्वीकारले असल्याने श्री. दारव्हेकर यांच्या प्रतिभेचा प्रत्यय सर्व मराठी रसिकांना येऊ शकेल.

–व. कृ. वऱ्हाडपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कळलाव्या कांद्याची कहाणी

(लेखकः—रत्नाकर मतकरी, प्रकाशकः—ग. रा. भटकळ,
पॉप्युलर बुक डेपो, लॅमिग्टन रोड, मुंबई ७, पृष्ठें ८६, मूल्य २ रु.)

सौ. सुधा करमरकर यांनी लिटल् थिएटर तर्फे सादर केलेले श्री. रत्नाकर मतकरी यांचे हे तीन अंकी नाटक. हे नाटक छोटयांसाठी आहे व त्यामुळेच छोटयांना (आणि मोठयांनाहि) एकदम रुचेल...आकर्पक वाटेल अशा अद्‌भुतरम्य कथानकाचा आश्रय यात घेतलेला आहे. स्वतः लेखकांनीच आपले हे नाटक स्वतंत्र नसून त्याला 'Crying Princess and the golden goose' या सुप्रसिद्ध पाश्चात्य परिकथेचा आधार असल्याचे सांगितले आहे. परंतु कथानक जरी पाश्चात्य असले तरी त्याचे अस्सल भारतीय वळणाचे नाटयरूपांतर करणे—त्यातील प्रयोगक्षमता व अद्‌भुतरम्यता कायम ठेवून करणे—ही वरीच कठीण असलेली बाब श्री. मतकरी यांनी अत्यंत कुशलतेने हाताळलेली दिसते. नेहमीच खाण्याची स्वप्न पाहणारा खादाड राजा, त्याची राणी, राजकन्या, ज्याचे सारे ज्ञान ज्ञानकोशात समावले आहे असा राजपंडित इत्यादि पात्रे आपल्या स्वभावाने सर्वांनाच मनमुराद हसवितील. फळांच्या करंडीत चुकून आलेला कांदा राजकन्या सोलू लागते. त्याबरोबर तिच्या डोळयांना पाणी येते. ते थांबत नाही. (कांदा ही त्या सर्वांनाच नवखी वस्तु असते.) अखेर राजवैद्यांना वोलावण्यात येते. राजकन्येला नक्राश्रुरोग जडल्याचे ते निदान करतात. यावर उपाय एकच ! तिला तीन पळ न थांबता हास्य करावयास लावणे—आणि सोनेरी हंसाला अनेक माणसे चिकटलेली पाहून राजकन्या हसू लागताच, तिचा हा रोग नाहीसा होतो.

—श्री. मतकरी यांचे हे नाटक पोरांनाच नव्हे तर थोरांनाहि (चोरून) वाचावेसे वाटेल इतके मजेदार निश्चितच आहे.

—व. कृ. वऱ्हाडपांडे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सम्पादकीय (पृष्ठ २ वरून)

वाढवयाची असतील तर ही किंवा या सारखी अनेक शल्ये दूर झाली पाहिजेत. त्यासाठी रसिक वाचक, टीकाकार, संपादक, प्रकाशक, साहित्यसंस्था, सरकार इ. सर्वांनी मन:पूर्वक प्रयत्न करायला हवेत.

'हरिवरदा' या ग्रंथाचे अष्टखडात्मक प्रचंड प्रकाशन-कार्य यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल आम्ही श्री. द. र. कोपर्डेकर यांचे अभिनंदन करतो.

श्रद्धांजलि

विदर्भ साहित्यसंघाचे अेक आजीव सभासद व हितचिंतक न्या. मु. काकासाहेब पुराणिक हे दि. १० मे रोजी निधन पावले. विदर्भ साहित्य संघाला ज्यांचे सतत मार्गदर्शन व सहाय लाभले अशा थोड्या व्यक्तींपैकी कै. काकासाहेब हे अेक होते. त्यांच्या निधनाने विदर्भ साहित्य संघाची व इतर अनेक सार्वजनिक संस्थांची हानि झाली आहे. आम्ही काकासाहेबांच्या पुण्यस्मृतीला अभिवादन करतो व त्यांना श्रद्धांजलि अर्पण करतो.

गेल्या अेक-दोन महिन्यात साहित्य क्षेत्रातील आणखी दोन थोर व्यक्ति कालवश झाल्या. 'कांहीतरी' या गाजलेल्या कविता संग्रहाचे कवि श्री. ह. स. गोखले यांचे १६ मार्च रोजी देहावसान झाले. तसेच दि. ७ अेप्रिलला 'केसरी-मराठा' पत्रांचे माजी संपादक श्री. दा. वि. तथा बाबूराव गोखले हे निधन पावले. लोकमान्य टिळकांचे सहकारी, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, पत्रपंडित इ. अनेक नात्यांनी श्री. बाबूराव गोखले हे प्रसिद्ध होते.

या दोघांनाहि आम्ही आमची श्रद्धांजलि अर्पण करतो.

विदर्भातील अेक थोर नेते सर मोरोपंत जोशी हे वर्षप्रतिपदेला दिवंगत झाले. कार्यरत व कीर्तिप्रद शतायुषी जीवन लाभणे ही भाग्याचीच गोष्ट होय. सर जोशी हे असे भाग्यवंत होते. त्यांच्या निधनाने एक थोर कर्तबगार व्यक्ति नाहीशी झाली आहे. आम्ही त्यांना आपली श्रद्धांजलि अर्पण करतो.

-संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugwani) Regd. No. N 356

हे मासिक एम्. जो. सराफ यांनी नागपुर टाईम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ